अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

रविवार, दि.१५ जानेवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ११० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




# याची देही; याची डोळा, पाहिला अक्षता सोहळा

**सत्यम् सत्यम्.. दिड्डम दिड्डम...** महाराष्ट्रासह आंध्र आणि कर्नाटकमधून श्रध्देने आलेल्या सिध्देश्वरभक्तांच्या साक्षीने शनिवारी दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी संमती कट्ट्यावर नंदीध्वजांचा अक्षता सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला. भक्ती, शक्ती आणि किर्ती यांचा सुरेख संगम असलेला सोहळा पाहून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. संमती वाचन केल्यावर 'सत्यम सत्यम दिड्डम दिड्डम' असे शेटे यांनी म्हणताच भाविकांनी अक्षता टाकून 'श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज की जय' चा एकच जयघोष केला.

# ऊस उत्पादकांच्या घरावर साडेचार हजार कोटींचा दरोडा

## कारखानदारांकडून काटामारीतून शेतकऱ्यांची वाटमारी

✔ सुराज्य/सोलापूर

**जगाचा पोशिंदा म्हणजे शेतकरी. तो रानात राबतो म्हणून प्रत्येकाच्या पोटात अन्नाचे दोन घास जातात. मात्र त्याच शेतकऱ्यांच्या घरावर वर्षाकाठी साडेचार हजार कोटींचा दरोडा टाकण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून साखर कारखानदारांकडून बेमालूमपणे सुरू आहे. कारखानदारांकडून काटामारीतून होणारी ही शेतकऱ्यांची वाटमारी सुरू आहे, असा स्फोटक आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माजी खा. राजू शेट्टी यांनी केला.**



पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने उभारलेल्या वजन काट्याचे लोकार्पण झाल्यानंतर शेट्टी हे माध्यमांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी वरील गंभीर आरोप केला.

राज्यात दरवर्षी सुमारे १३ कोटी ३१ लाख टन उसाचे गाळप केले जाते. त्यातील तब्बल सव्वाकोटी टन उसाची चोरी कारखानदारांकडून केली जाते. म्हणजेच चोरलेल्या उसातून सुमारे साडेचार हजार कोटी रुपयांची साखर कारखानदारांना मिळते.

हा चोरीचा पैसा कारखानदारांच्या घरात जातो. त्यातून ते गबरगंड होतात आणि रात्रंदिवस राबणारा शेतकरी कंगाल होतो, असे विदारक चित्र शेट्टी यांनी यावेळी मांडले.

### प्रत्येक जिल्ह्यात स्वाभिमानीचे वजनकाटे

यंदाच्या हंगामात राज्यातील १९६ साखर कारखाने सुरू झाले आहेत. या सर्वच कारखान्यातून उसाची काटामारी शेतकऱ्यांची वाटमारी सुरू आहे. या काटामारीला चाप लावण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यात वजन काटे बसवण्यात येणार आहेत. त्याची सुरुवात पंढरपुरातून झाली असून याठिकाणी नाममात्र किमतीमध्ये शेतकऱ्यांना वजन करून दिले जाणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

### एफआरपीची रक्कम मिळवणारच

पुढील गळीत हंगामापासून प्रत्येक कारखान्याने इलेक्ट्रॉनिक वजन काटे बसवावेत; असा आदेश साखर आयुक्तांनी काढला आहे. मुख्यमंत्र्यांनी आदेश देऊनही अद्याप अनेक कारखान्यांनी एफआरपीची रक्कम एकरक्कमी दिलेली नाही. ही रक्कम कारखानदारांच्या बोकांडी बसून वसूल केली जाईल, असा इशाराही यावेळी शेट्टी यांनी दिला.

# शिंदेंचे नातू शिखर दिसले यात्रेत; वारसदाराची चर्चा झाली सुरू

✔ सुराज्य/सोलापूर



सुशीलकुमार शिंदे यांनी त्यांची मोठी मुलगी स्मृती पहाडीया यांचे चिरंजीव शिखर यांना सिद्धेश्वर महायात्रेत आणले. याद्वारे त्यांनी आपल्या विरोधकांना झटका दिल्याचे बोलले जात आहे. यावरून आता आपल्या राजकारणाचा शिखर पहाडिया हेच वारस आहेत की काय असा संदेश तर ते देऊ पाहत नाहीत ना, अशी चर्चा सुरू झाली आहे.

सोलापुरात आज ग्रामदैवत सिद्धेश्वर महायात्रेचा महत्त्वपूर्ण विधी अक्षता सोहळा संमती कट्ट्यावर पार पडला. या अक्षता सोहळ्यात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे पत्नी उज्वला शिंदे व नातू शिखर पहाडिया यांच्यासह उपस्थित होते.

सुशीलकुमार शिंदे यांचे नातू शिखर हे सोलापूरमधील कोणत्याही सार्वजनिक उत्सवात कधी सहभागी होत नव्हते. पण शनिवारी रोजी सिद्धेश्वर महायात्रेत सुशीलकुमार शिंदेंसह त्यांचे नातू शिखर देखील उपस्थित होते. मी आता दरवर्षी सिद्धेश्वर महायात्रेला हजर राहणार, असे यावेळी शिखर यांनी सांगितले. सुशीलकुमार शिंदे यांना तीन मुलीच आहेत. प्रणिती शिंदे या सोलापूरच्या राजकारणात सक्रिय आहेत. त्या सोलापूर शहर मध्यमधून आमदार आहेत.

शिंदे यांना मुलगा नसल्याने त्यांचा वारस प्रणिती शिंदे यांच्याकडे पाहिले जात होते. मात्र, सुशीलकुमार शिंदेंनी शिखर पहाडिया यांना आणून चर्चा मात्र घडवून आणली आहे. शिंदेचे नातू शिखर यांनी बोलताना माहिती दिली की, दरवर्षी मी सिद्धेश्वर महायात्रेत येणार आहे. समाजकारणातून राजकारणात येणार का, असा प्रश्न विचारताच त्यांनी उत्तर देणे टाळले. याबाबत शिंदेना देखील यावरच प्रश्न विचारला असता त्यांनी नातू शिखरकडे बोट केले.


# पत्नीबरोबर वाद; पतीची गळफासाने आत्महत्या

✔ **मंगळवेढा** : पत्नीबरोबर किरकोळ स्वरूपाचा वाद झाल्याने रागाच्या भरात ऊसतोड कामगार पतीने आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना माचणूर येथे घडली. विठ्ठल किसन माने (वय २६ रा.जनेवाडी ता.पाटोदा जि.बीड) असे त्या पतीचे नाव आहे. माने पती-पत्नी ऊसतोडीचे काम करतात.

माचणूर परिसरातील ब्रम्हपुरी-मुंढेवाडी रस्त्यालगत ऊसतोडणी मजूर कोप्या घालून ते रहावयास होते. विठ्ठल आणि त्यांची पत्नी यांच्यामध्ये घरातील किरकोळ वाद झाला होता. रागाच्या भरात विठ्ठल माने याने दि.१३ रोजीच्या सकाळी ७ पूर्वी शेतामधील बांधावर असलेल्या आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हरितक्रांतीची आठवण होते!


कल्याण

247-33-670

### सीसीएच ॲप प्रकरण

# आरोपी महिलेचा शोध सुरु

✔ सुराज्य/सोलापूर



सीसीएच ॲप प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांच्या अटकेत असलेल्या अनंत व जयंत येरंकल्लू बंधू यांची दोन दिवसात जवळपास १२ तास चौकशी झाली. यात महत्त्वाची माहिती पोलिसांच्या हाती लागली आहे.तसेच या प्रकरणातील महिला आरोपीला पकडण्यासाठी पोलीस पथक रवाना झाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

या गुन्ह्याशी संबंधित जवळपास आठ ते दहा इसमांचीही पोलिसांनी चौकशी केली.गुन्हा दाखल झाल्यापासून ते अटक होईपर्यंत आरोपी कोणा-कोणाच्या संपर्कात होता, त्याला त्या काळात खर्चासाठी कोणी मदत केली. याची माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे. शिवाय याप्रकरणी पुढील काही दिवसात तिसऱ्या आरोपीलाही अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली. अल्प मुदतीत जादा पैसे मिळवून देण्याचे आमिष ॲपच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक केल्याप्रकरणी अनंत येरंकल्लू व जयंत येरंकल्लू, स्मिता येरंकल्लू विरुद्ध ऑक्टोबरमध्ये गुन्हा दाखल झाला होता.

# नांदेडचा शिवराज राक्षे ठरला महाराष्ट्र केसरी

▸ **महेंद्र गायकवाडला चीतपट करत पटकावले जेतेपद**

✔ सुराज्य/पुणे



महाराष्ट्र केसरीची अंतिम लढत ही चांगलीच रंगतदार ठरली. नांदेडच्या शिवराज राक्षे याने महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला. त्याने महेंद्र गायकवाडला चीतपट करत हा बहुमान पटकावला. पैलवान शिवराज राक्षे हा ५५ वा महाराष्ट्र केसरी ठरला आहे.

माती विभागात महेंद्र गायकवाडने सिकंदर शेखवर मात करत ही अंतिम फेरी गाठली होती. गादी विभागात शिवराज राक्षेने यावेळी हर्षवर्धन सदगीरला पराभूत करत फायनलमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळे हे दोन्ही दिग्गज मल्ल महाराष्ट्र केसरीच्या लढतीसाठी सज्ज झालेले पाहायला मिळाले होते. पुण्यातील स्व. मामासाहेब मोहोळ क्रिडानगरीत ६५व्या महाराष्ट्र केसरी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संस्कृती प्रतिष्ठानच्यावतीने संस्थापक अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ४५ संघ आणि ९०० हून अधिक पैलवान या स्पर्धेत उतरले होते. या स्पर्धेची सुरुवात १९६१साली झाली होती.

या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ब्रिजभूषण सिंह, भाजपा मंत्री चंद्रकांत पाटील, क्रिडामंत्री गिरीश महाजन यांची उपस्थिती होती. अंतिम फेरीत पोहचलेले दोन्ही मल्ल हे पुण्याच्या एकाच तालमीत तयार झालेले आहेत. वस्ताद काका पवार व गोविंद पवार यांच्या कात्रजमधील आंतरराष्ट्रीय क्रिडा संकुल तालमीतील हे कुस्तीपटू आहेत. महाराष्ट्र केसरी ठरलेल्या शिवराज राक्षे यास चांदीची गदा, रोख पाच लाख रुपये आणि महिंद्रा थार ही गाडी बक्षीस रूपात मिळाली आहे. तर, उपविजेत्या महेंद्र गायकवाडला ट्रॅक्टर आणि अडीच लाख रुपये बक्षीस मिळाले आहे.

# नाट्य आराधना व कै. सिद्धा पाटील स्मृती समितीतर्फे संगीत मैफिल

✔ सुराज्य/सोलापूर

**नाट्य आराधना, सोलापूर व कै. सिध्दा पाटील स्मृती समितीमार्फत फैय्याज शेख, यतीन शहा व डॉ. सुहासिनी शहा यांचा गौरव आणि सानिया पाटणकर व प्रसिद्ध सतारवादक समीप कुलकर्णी यांचा जुगलबंदीचा कार्यक्रम तसेच भरतेश तडवळकर यांचे सोलो तबलावादन व ईश्वरी दुलंगे हिच्या नाट्यपद गायनांचा कार्यक्रम गुरूवार दि. १९ जानेवारी २०२३ सायंकाळी ५.३० वा. हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे.**


या दिवशी कै. सिद्धा पाटील यांची २५ वा स्मृतिदिन आहे. गेली २४ वर्षे पाटील परिवारातर्फे विविध नाट्यसंगीताचे व नाटकाचे कार्यक्रम आयोजित करून सिद्धा पाटील यांच्या स्मृतीला अभिवादन केले जाते.

बालगंधर्वांचे निरसीम चाहते, कै. सिद्धा तथा एस. एम. पाटील यांच्या स्मृतिदिनी संगीत नाटके, नाट्यगीतांचा कार्यक्रम सादर करून सोलापूर नाट्यसंगीत प्रेमींना एक हवीहवीसी संगीत मेजवानी दिली जाते. प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी गुरूवार दि. १९ जानेवारी २०२३ रोजी अनाहत निर्मित सूर-ताल हा संगीताचा सुमधूर कार्यक्रम सादर होत आहे.

या कार्यक्रमात पुण्याच्या गायिका सूरमणी सानिया पाटणकर व प्रसिद्ध सतारवादक समीप कुलकर्णी यांचा गायन आणि वादनाचा जुगलबंदी कार्यक्रम सादर होत आहे.





या कार्यक्रमाच्या सुरूवातीस कै. सिद्धा पाटील यांच्या जुन्या स्नेही-ज्येष्ठ अभिनेत्री फैय्याज शेख तसेच सोलापूरचे प्रसिद्ध उद्योगपती तथा नाट्यरसिक यतीन सुभाष शहा आणि प्रसिद्ध उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या व नाट्यरसिक डॉ. सुहासिनी यतीन शहा यांचा गौरव, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती जस्टीस श्रीनिवास मुतालिक यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ विधिज्ञ, श्री सिध्देश्वर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. एस. आर. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ विजय मराठे हेही उपस्थित राहणार आहेत.

या संगीत कार्यक्रमात जुगलबंदी कार्यक्रमानंतर भरतेश तडवळकर यांचे सोलो तबलावादन सादर होणार असून त्यांना संवादिनीवर पुण्याचे माधव लिमये हे साथ देणार आहेत. याशिवाय सोलापूरची उदयोन्मुख गायिका ईश्वरी दुलंगे ही या कार्यक्रमात काही नाट्यपदे सादर करणार असून त्यांना संवादिनीवर प्रशांत देशपांडे साथ देणार असून तबल्याची साथ नितीन दिवाकर देणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन मंजुषा गाडगीळ या करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. तरी सोलापुरातील सर्व नाट्यरसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे सिद्धा पाटील स्मृती समितीचे संयोजक अॅड. आर. एस. तथा बाबू पाटील यांनी केले आहे.

# सिद्धराम आणि शिक्षण

**सिद्धराम हा एक उत्तम अनुभवी. त्यांचा अनुभव केवळ वाचनाने तयार झालेला नाही. व्यावहारिक जीवनात गतिमान आधारावर तयार झालेला आहे. बाराव्या शतकातील शरणाचा परंपरा वैशिष्ट्यपूर्ण असणे हेच विशेष आहे. त्यांनी त्यांच्या वचनात वाचन, शिक्षण, ज्ञान, जागरूकता आणि अनुभव याविषयी व्यक्त केलेली मते खरोखरच प्रेरणादायी आहेत. या उच्च विचार मालिकेचे निरीक्षण करताना सिद्धराम कोणत्या पद्धतीने शिकविले त्यांचे गुरु कोण आहेत. हे सर्व जाणून घेण्यास योग्य आधार नसला तरी शरणाचा सहवास, विशेषतः बसवण्णा, चेन्नबसवण्णा यांच्याशी त्यांचा जो संबंध अनुभवाच्या दालनाचा चर्चा त्यातून स्वतःच्या अनुभवाचा मार्ग पत्करून ज्ञानाच्या दिशेने जाता आले. अनुभवमध्ये न स्थिरणारा वाचन म्हणजे मुळीच वाचन नाही असे सिद्धरामांचे मत आहे. त्याच्या एक वचनांमध्ये वाचनाबद्दल सहज, सार्थक, स्पष्टता अशी केली आहे.**

**ओदिद फल मलयराजंगायित्तु**
**ओदिद फल जन्मवलीदवंगायित्तु नोडा**
**कपिलसिद्ध मल्लिकार्जुना**


असे म्हणत खरे वाचकांची रूढ सांगतात. तसेच, वाचन करून ज्ञान न मिळवणाऱ्या परिस्थितीला आपल्या वचनातून सिध्दरामाने असे सांगतात.

**ओदिद फल मयूरनंतागबारदू**
**ओदिद फल नम्म हावीनाळ कल्लय्यन**
**मनेय स्वानवंतागबेकू काणा**
**कपिलसिद्ध मल्लिकार्जुना**

हे खरे वाचनाच्या हितकारक हविनाळ कल्लय्या सिध्दरामाने सार्वजनिक कामामध्ये कार्य करून; कुत्र्याकडून वेद वाचून एक चमत्कार केला. ही सिध्दरामाच्या वरील वचनाची साक्ष आहे. या चमत्काराची शक्यता कितीही असली तरी खऱ्या वाचनाने ज्ञान आणि अनुभव येतो हे येथे लक्षात घेतले पाहिजे. वाचून शहाणे व्हायचे असेल तर शिकल्याशिवाय इतरांचे ऐकू नये, असे सिध्दरामांचे मत आहे. शिक्षणाने नम्रता आणि ज्ञान मिळायला हवे. त्यामुळे अहंकार निर्माण होऊ नये, असे सांगून ते म्हणतात, 'शिक्षित व्यक्तीला धक्काबुक्की केली जाते, तर अशिक्षित व्यक्तीला जगातून हाकलून दिले जाते. आपण शिकलेल्या ज्ञानाचा समाजाच्या फायद्यासाठी नेला पाहिजे.' असे सिध्दरामाचे स्पष्ट मत होते. शिक्षण म्हणजे केवळ भारत रामायण नाही. शिक्षणाने आपल्याला ज्ञान दिले पाहिजे, असे सांगतानाच सिध्दरामांनी प्रबळ बौद्धिक वास्तवाच्या आधारे सुंदर वचनात वास्तव प्रतिपादन केले आहे.

**आघर वचनव्यंबुद्ध बहुवैद्यवय्या**
**नम्म कपिलसिद्ध मल्लिकार्जुनन तिलियलीके**

असे सांगून सिध्दरामाने बाराव्या शतकातील शरणांचे ज्ञान समजून घेण्याची पद्धत समाजासमोर मांडली आहे. सिध्दरामाच्या वाचनाची व्याप्ती इतकी व्यापक आणि उदात्त होती की खुल्या विचारांतून हे स्पष्ट होते ज्ञान व्यक्तिमत्त्वाच्या परिपूर्णतेसाठी हे साधन आहे. ते सर्वत्र आहे. ते वाढवणे हे आपले काम असले पाहिजे. या सर्व शैक्षणिक कल्पना लोकांसमोर मांडणाऱ्या सिध्दरामाने ज्ञान, अनुभव आणि त्याद्वारे शिष्याचा दर्जा मिळवण्यात मार्गदर्शक असलेल्या गुरूबद्दल विचार केला आहे. सिध्दरामाच्या दृष्टीने गुरू आणि शिष्यांचे नाते अपरिहार्य बनले आहे. गुरु कसा असावा? सिध्दरामाने आपल्या एक वचनांमध्ये हे स्पष्ट केले आहे.



**शिष्यनेंब वनक्के वसंत नोडा गुरु**
**शिष्यनेंब तीमीरक्के ज्योती नोडा गुरु**
**शिष्यनेंब रात्रीगे सूर्य नोडा गुरु**
**शिष्यनेंब ननगे प्रकृष्ट प्रमथ चिंतामणी**
**चन्नबसव गुरु कपिलसिद्ध मल्लिकार्जुना**

खरा गुरू कोण आहे हे सांगताच अल्लामाच्या आगमनानंतर बसवण्णा, चन्नबसवण्णा यांना पाहून त्यांच्याकडून सहज ज्ञान आणि अनुभवाचे वचन ऐकून इष्टलिंगदीक्षा प्राप्त झालेल्या सिध्दरामांनी चेन्नबसवण्णाला प्रकृष्ट प्रथम चिंतामणी चेन्नबसवण्ण गुरु असे म्हणतात. शिक्षकाचे काम केवळ शिष्याला मार्गदर्शन करणे एवढेच नाही तर शिष्याला स्वतःसारखा गुरू बनवण्यात अनुसरण करण्यात आहे. हे सिध्दरामांची गुरु आणि शिष्य यांच्यातील संबंधातील कल्पना दर्शवते. ज्ञान जिथून येईल तेथून स्वीकारण्याचे उदार मन असले पाहिजे. संकुचित, पूर्वग्रहदूषित मन नसावे असे सांगून,

**ज्ञानीगळाद बळीक परिपूर्ण जगत्तेंदरीयबेकू**
**ज्ञानीगळाद बळीक पापवासने तोरेदिरबेकू**
**ज्ञानीगळाद बळीक अन्यर नूडीगे वळगागबारदु**
**ज्ञानीगळाद बळीक अन्यर निंदेगे वळगागबारदु**
**कपिलसिद्ध मल्लिकार्जुना**

एवढेच नाही तर ज्ञानीने ज्ञान घेतल्यानंतर इतरांची खुशामत अडकू नये, असत्य बोलू नये, गुरुजन वर्गांना सन्मान द्यावा अन्य स्त्रियांना आपल्या आईसारखे मानावे. ज्ञान चैतन्यविरहित असावे. संशयी नसावे, इतरांची निंदा करू नये, पैशाची चोरी करू नये, गुरुसेवा ही ज्ञानाची अनंत मुकवाड सांगत सहज- सार्थक आचरण हेच ज्ञानाचे मार्ग असल्याचे ते म्हणतात. खऱ्या धर्माचे जीवन ही सुद्धा ज्ञानाचीच कृती आहे, असे सांगून ज्ञानीने ज्ञान घेतल्यानंतर लिंगाची पूजा करावी, जंगम दासोह करावे हे चुकू नये. संपूर्ण जीवन ज्ञानावर आधारित असावे. ही त्यांची इच्छा होती. ज्ञान आणि कृती या सिध्दरामासाठी एका नाण्याच्या दोन बाजू होत्या. ज्ञानाशिवाय कृती काही उपयोगाची नाही. कृतीतील ज्ञान म्हणजे निरर्थक हा त्यांचा निष्कर्ष होता. सिध्दरामाची ज्ञान कृती बंध आपल्याला या वचनाची आठवण करून देतो अंतरंगादल्ली **अरिवादोडेनु बहिरंगदल्ली क्रियेयागदनक्क** सिध्दराम हे ज्ञान आणि कृती यांचा संगम होते हे खरे. 'ज्ञानाने समाधान मिळवायचे असेल, तर अनुभावाची आशा ठेवली पाहिजे. विद्या शिकून ज्ञान, बुद्धी मिळवणे पुरेसे नाही, ते अनुभवात रुजले पाहिजे.

**वचीसी अनुभावीयागदव पिशाचीवय्या**
**वचीसी अनुभावीयागदव पंडितनय्या**
**विद्या ऐंबुदु अभ्यासिकन वश**
**अविद्या ऐंबुदु सर्ववल्ली वश**
**विद्याविधीयनरीतु जगद्रेयनागबल्लडे**
**महापंडित नोडा कपिलसिद्ध मल्लिकार्जुना...** असे सांगून, केवळ वचन मनोरंजक पद्धतीने सांगून प्रभुत्व दाखवणे पुरेसे नाही आणि आपला वाचनाचा अनुभव पराकोटीचा असावा. जीवनाचे अंतिम सत्य समजू शकत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात की स्वतःला शोधण्यासाठी आणि परिपूर्णतेकडे वाटचाल करण्यासाठी अंतरज्ञान जितके महत्त्वाचे आहे तितकेच सर्वव्यापी अज्ञानाचा नाश करण्यासाठी ज्ञान महत्त्वाचे आहे आणि जीवनाच्या पूर्णतेसाठी अंतरज्ञानची आवश्यकता दर्शविते. सिध्दरामाचे शिक्षण, ज्ञान आणि अनुभव याविषयीचे विचार आजच्या औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणापेक्षा वेगळेच नाहीत, तर त्यांचे विचार हे सार्वजनिक शिक्षणाचेही एक मॉडेल आहे. सिध्दरामाच्या शिक्षणाच्या या सर्व कल्पना केवळ अगोदरच्या नाहीत, तर आजही आपल्याला विचार करायला लावतात. आजचे शैक्षणिक हे केवळ नोकरीसाठी उद्देश असून, सिध्दरामांचे शिक्षण हा केवळ नोकरीसाठी नव्हे ज्ञानाच्या, अनुभवाच्या प्राप्तीसाठी आहे, असे सांगतात.

**- प्रा. शिवानंद तडवळ.**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर.

# अवस्था बदलण्यासाठी व्यवस्था निर्माण करणारा नेता

**सोनेरी जीवनाची स्वप्ने प्रत्येक जण पाहत असतो आणि ते सत्यात उतरण्यासाठी प्रयत्नही करत असतो. मात्र, पूरक वातावरणाअभावी त्याची ही स्वप्ने पूर्णत्वास जाताना दिसत नाहीत. ही वातावरण निर्मिती झाली पाहिजे आणि त्या माध्यमातून जनजीवनाला समृद्धी प्राप्त झाली पाहिजे, सर्वसामान्य माणसांची आर्थिक उंची वाढली पाहिजे, याच उद्देशाने प्रेरित होऊन सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी केलेले प्रयत्न सत्कारी लागले. आर्थिक कुचंबणेची व अप्रगतीची त्यांनी कारणे शोधली आणि सहकाराचे बीज प्रत्येकाच्या मनात पेरून सहकार क्रांतीचा उदय घडवून आणला.**



सामूहिक शक्तीच्या माध्यमातून परिवर्तनाचा विचार सर्वांगीण विकासाचे साधन ठरू शकतो या विचाराप्रति ठाम राहून त्यांनी आमूलाग्र बदलाची क्रांती निर्माण केली. विदारक परिस्थितीलाही बदलण्याची ताकद आपल्यात असते, असा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून जगासमोर मांडला. यामुळे भागाचा, प्रदेशाचा किंबहुना देशाचा चेहरा मोहरा बदलून टाकण्यामध्ये अग्रगण्याची भूमिका त्यांनी निभावली. परिसर त्यांच्या त्या भूमिकेमुळे विकासाचे कोंदण प्राप्त करून उभा राहिला. स्वप्ने अशीच साकार होत नसतात, जन जीवनाला उगीच कलाटणी मिळत नसते, त्यासाठी प्रेरक भूमिका निभावाव्या लागतात. म्हणूनच ते एक युगपुरुष ठरले. आपल्या असीम त्यागातून त्यांनी या धरतीला हरितक्रांतीचा श्वास प्राप्त करून दिला.आर्थिक समृद्धतेचा आत्मविश्वास त्यांनी प्रत्येकाच्या मनात निर्माण केला. आपण हे करू शकतो आणि प्रगतीच्या दिशा ठरवू शकतो, या आत्मबलावर सहकाराचे साम्राज्य विविधतेने नटत गेले.

शेती समृद्ध आहे पण पिकवणाऱ्यांची अवस्था भांडवलदारी व्यवस्थेपुढे आणखी डबघाईला गेल्याशिवाय राहणार नाही आणि भविष्यात ही संस्कृतीप्रधान असणारी व्यवस्था ढासळल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच सहकाराचा मंत्र प्रत्येकाच्या मनामनात भरला आणि त्या माध्यमातून प्रत्येकाला विकासाची दारे खुली केली. परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करून समस्यांचे मूळ शोधले आणि त्यावर ते मात करत गेले. लोकांमध्ये जाऊन त्यांना त्यांच्या मूळ समस्येचे उत्तर सांगितले आणि त्यातून व्यवस्था निर्माण करून समृद्धतेचा पताका अभिमानाने, स्वाभिमानाने फडकवला.

स्वातंत्र्यानंतरच्या भारताला आत्मसन्मानाने उभे करणे गरजेचे बनले होते. कारण भांडवलशाहीतील हुकूमशहा पुन्हा एकदा ब्रिटिशांसारखी मालकी भूमिका नि भावनेच्या बेतात होते. हा डाव ओळखून प्रतिडाव खेळणे काळाची गरज बनली होती म्हणूनच सहकाराची लोककल्याणकारी खेळी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी खेळली आणि त्यात ते यशस्वी झाले. देश उभा राहू लागला. खऱ्या स्वातंत्र्याचा आनंद लोकांच्या चेहऱ्यावर दिसू लागला. काम आणि दाम याची निश्चितता प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली. केलेल्या कष्टाला भागीदारीची जोड मिळाल्याने लोक जीवनाच्या प्रगतीची चक्रे अधिक तीव्रतेने गतिमान झाली. त्यातूनच मग लोकांनी शेती व्यवसायाला पूरक म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन अशा उद्योगाची जोड देत आपल्या कामाचा आवाका वाढविला. आर्थिक समृद्धतेने लोकांमध्ये नव जीवनाच्या प्रेरणा निर्माण झाल्या आणि यास सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील कारणीभूत ठरले. लोकांच्या मनामध्ये असणाऱ्या कर्तृत्वाला त्यांनी जागृत केले, खुणावले. त्यामुळे हरित क्रांती साकारली.

**- डी. एस. गायकवाड, अकलूज.**

# सोलापूरचे शिवयोगी सिद्धाराम

**भक्त प्रल्हाद, ध्रुव बाळ या भारतीय इतिहासातील तेजस्वी बालकांच्या मालिकेत शिवयोगी सिद्धरामेश्वरांचाही समावेश होतो. श्रीशैल मल्लिकार्जुनावर प्रगाढ भक्ती असलेला बालक सिद्धाराम कर्मयोगी आहे. त्यांनी ६८ हजार वचने लिहिली आहेत. एकदा शिवयोगी श्री. रेवणसिध्देश्वर धर्मोपदेश करत करत सोलापूरच्या सीमेजवळ आले होते, सीमेजवळ येताच ते तेथेच थांबले व सीमेला नमस्कार करून पुढे निघाले. ते पुढे मुद्दगौडांच्या वाड्यासमोर आले व तेथे थांबून त्यांनी भविष्य वर्तवले की या वाड्यात एक महान शिवयोगी जन्माला येणार आहे. त्या मुद्दगौडाची पत्नी वयस्कर होती. तरी रेवणसिध्देश्वरांच्या आशीर्वादाने त्या गर्भवती राहिल्या. पुढे तिने एका देखण्या मुलाला जन्म दिला. तो देखणा मुलगा म्हणजेच सिध्दरामेश्वर होय. ते दहा वर्षांचे झाले तरी त्यांना बोलता येत नव्हते तसेच ते थोडेसे मंदही होते. त्यातून मार्ग म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्याला गुराख्याचे काम दिले होते. त्या कामात ते रमले होते. गुरे चारत असता एके दिवशी त्यांना एक जंगममूर्ती भेटले. त्यांचे नाव होते मल्लय्या ते श्रीशैलहून आलेले होते. त्यांनी त्या सिध्दरामेश्वराला हुरडा खायला मागितला. त्यावेळी सोलापुरात ज्वारीचे पीक उत्तम येत होते. हुरड्याच्या पार्ट्या होत होत्या. मल्लय्यांनी सांगितल्याप्रमाणे सिद्धरामांनी आईकडे हुरड्याची मागणी केली. ते आयुष्यात पहिल्यांदा आईशी बोलले. त्यांची वाणी ऐकून आई एकदम अवाक झाली. हुरडा घेऊन ते मल्लय्यांना देण्यासाठी परत गेले, तर मल्लय्या अंतर्धान पावले होते. त्यांना शोधण्यासाठी ते तेथील माळरानात भटकले पण ते काही भेटले नाहीत. शेवटी निराश होऊन एका दरीत उडी घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याच मल्लय्यांनी त्यांना परावृत्त केले व त्यांना उपदेश केला की, तू सोलापूरला परत जा, वेळेप्रसंगी मी तुला मदत करीन. तेथील मंदार वृक्षाखाली मी लिंगरुपाने भेटेन. त्याप्रमाणे सिद्धरामांनी सोलापुरात ६८ लिंगाची स्थापना केली. त्यावेळी सोलापूरला पाण्याचे दुर्भिक्ष्य होते म्हणून त्यांनी लोकांसाठी तेथे एक तलाव खोदला, तोच सोलापूरचा सिध्देश्वर तलाव होय. पंढरपूरला यात्रेसाठी जाणाऱ्या भक्तांचा त्रास वाचावा म्हणून सिध्देश्वर मंदिराच्या गर्भदेवालयाच्या डाव्या बाजूस विठ्ठल मंदिर उभे केले आहे.**




अशा सिध्देश्वरांच्या स्मृती प्रित्यर्थ संक्रांतीला मोठी यात्रा भरते, तिला गड्ड्याची यात्रा म्हणतात. त्यावेळी नंदिध्वजाची मिरवणूक अक्षता सोहळा व होम प्रदीप्रन हे कार्यक्रम नियमित होतात. त्यामागे एक घटना आहे. श्रीसिद्धरामेश्वर एका गुहेत साधना करीत असत. ते गुहेतून बाहेर येण्यापूर्वी एक महिला दररोज सडा रांगोळी काढत असे. एकदा सिध्दरामेश्वरांनी विचारले की कशासाठी हे करतेस? ती स्त्री एका कुंभाराची मुलगी होती. तिने सांगितले की, 'तुमची सेवा म्हणून मी हे सर्व करते. खरे तर तिच्या मनात सिध्दरामेश्वर भरले होते. त्यांच्याशी लग्न करावे अशी तिची इच्छा होती. ती इच्छा तिने त्यांच्यासमोर व्यक्त केली.' सिध्देश्वरांनी सांगितले की, 'हे मुली माझे मल्लिकार्जुनबरोबर लग्न झाले आहे, ते माझे पती आहेत. मी त्यांची सती आहे. अशा सती पती भावनेने मी येथे साधना करीत आहे तर एका सतीचा विवाह दुसऱ्या स्त्रीशी कसा होईल? पण ती ऐकायला तयार नव्हती. तिच्या समाधानासाठी सिध्देश्वरांनी आपल्या योगदंडाबरोबर प्रतीकात्मक लग्न करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने योगदंडाबरोबर लग्न केले. नेहमीप्रमाणे अक्षताचा सोहळा झाला. ती जीवनातून मुक्त झाली म्हणून तेथील होमकुंडात उडी घेऊन ती सती गेली. या सोहळ्यास स्वतः सिध्दरामेश्वर हजर होते. हा लग्न सोहळा रीतीरिवाजाप्रमाणे संपन्न झाला होता. पहिल्या दिवशी तैलाभिषेक झाला. तेथील ६८ लिंगांना व देवतांना अक्षता दिल्या होत्या. त्याप्रमाणे सध्या असलेल्या संमती कट्ट्यावर लग्नविधी अक्षताविधी पार पाडला. स्वतः सिध्देश्वरांनी एक मंगलाष्टक म्हटली होती, त्यानंतर वरात निघाली. सर्व लिंगांना व देवदेवतांना भेटी देऊन वरात परत आली. तिसऱ्या दिवशी योगदंडाला तेथील तळ्यात स्नान घालण्यात आले. कुंभार कन्येलाही स्नान घालण्यात आले होते. ती सर्व सौभाग्य अलंकार घालून सती जाण्यास तयार झाली होती. होमकुंडात त्या रात्री अग्निकाष्टे प्रज्वलित करून ती सर्वांसमक्ष सती गेली. अशा या विवाहाचे प्रतीक म्हणून दरवर्षी हे विधी साजरे केले जातात. नंदिध्वज हा योगदंडांना प्रतीक समजला जातो.

सर्व समाजाच्या भावना वाढल्या, प्रत्येक समाजाला आपला एक नंदिध्वज असावा असे वाटू लागले म्हणून सर्व समाजाला मान देण्यासाठी पुढे एकाऐवजी सात नंदिध्वज तयार केले गेले. ते सात नंदिध्वज खालीलप्रमाणे आहेत. १) देवस्थानचा २) कसब्यातील देशमुखांचा ३) लिंगायत माळी समाजाचा ४) विश्व ब्राह्मणांचा ५) सुतार समाजाचा ६) मातंग समाजाचा ७) दलित समाजाचा. अशाप्रकारे सिध्दरामेश्वरांनी निर्माण केलेले सिध्देश्वर देवस्थान आजही सोलापूरचे धार्मिक, सामाजिक कार्याचे अलंकार भूषण ठरले असून स्थानिक वृत्तपत्राने सुवर्ण सिध्देश्वर ही संकल्पना जानेवारी २०१५मध्ये सोलापूरकरांसमोर ठेवली, त्यास सोलापूरच्या सर्व भक्तांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन त्यास देवस्थान कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी व त्यांचे सहयोगी टीम त्यास हळूहळू मूर्त रुप आणत आहेत व सध्याला गर्भगृहात चांदीचे काम झाले असून सोनेरी कळसाचे काम पूर्ण झाले असून सन २०२३-२४ च्या वर्षभरात गर्भगृहासमोरील खुल्या जागेत हा सभामंडप ध्यानमंदिर आणि नवे छत होत आहे. सुवर्ण सिध्देश्वर महाअभियानांतर्गत याची उभारणी सुरू आहे. या सभामंडपाच्या भागात सोलापूर सर्वात मोठे ध्यान मंदिर होत आहे.

ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त वीरशैव व्हीजनतर्फे दरवर्षी सिद्ध सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. घरबसल्या भक्तांना सिध्देश्वराची भक्ती त्यांचे जीवन समजून घेता यावे, त्यांनी केलेल्या कार्याचा परिचय तसेच भक्तांच्या कल्पकतेला आणि सृजनशीलतेला वाव मिळण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून सजावट स्पर्धा आयोजित केली जाते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट या देश पातळीवरील संस्थेच्या माध्यमातून महापालिकेच्या इंद्रभुवन इमारतीमध्ये शहराची सांस्कृतिक ओळख आणि परंपरा दर्शविणारी छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आले असून त्यामध्ये सिध्देश्वर यात्रेच्या छाया चित्रांचा समावेश आहे. ग्रामदैवत सिध्दरामेश्वरांचे विलोभनीय मंदिर, ६८ लिंगांना तैलाभिषेक, नंदिध्वजाची मिरवणूक, अक्षता सोहळा, होम मैदानावरील होम विधी अशा ठळक घडामोडी छायाचित्रांच्या माध्यमातून सादर करण्याचा प्रयत्न या देश पातळीवरील संस्थेने केला आहे.

श्री सिध्दरामेश्वरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीतील ही यात्रा म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हटले पाहिजे. शहरातील सर्व समाजाचे हिंदू-मुस्लीम ब्राम्हण, साळी, बहुजन समाज ही यात्रा पार पाडण्यासाठी झटत असतात. पोलीस चोख असतो तसेच महाराष्ट्र इलेक्ट्रिक बोर्डाचे सेवक जातीने लक्ष घालून दिव्याची व्यवस्था चोख ठेवतात. महानगरपालिकाही रस्त्याची तसेच दिव्याची चोख व्यवस्था ठेवतात, त्यांचेही हार्दिक स्वागत. श्री सिध्देश्वर मंदिराची पंचकमिटी मंदिराच्या विकासांसाठी नियमित प्रयत्न करीत आहे.

**- डॉ. वसंतराव लवंगे,**
**नरखेड, ता. मोहोळ.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविकांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या : विखे-पाटील

## अक्कलकोट व पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर, अक्कलकोट अशी महत्त्वाची तीर्थक्षेत्रे आहेत. या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना तसेच नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना राज्याचे महसूल, पशूसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या अक्कलकोट व पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्या आढावा पालकमंत्र्यांनी घेतला त्यावेळी बोलत होते. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी सांडपाणी व्यवस्थापनाचा आराखडा तयार करून सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासोबतच त्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करण्याबाबतचे नियोजन करावे अशा सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी केल्या.**



नियोजन भवन सभागृहात झालेल्या बैठकीस आ. बबनदादा शिंदे, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, रणजीतसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, अप्पर जिल्हाधिकारी तथा विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी गजानन गुरव, मुख्याधिकारी सचिन पाटील आणि अरविंद माळी आदि उपस्थित होते. सोलापूरच्या आसपास अक्कलकोट, गाणगापूर, तुळजापूर अशी तीर्थक्षेत्रे आहेत. त्यामुळे एक किंवा दोन दिवसांत सर्व ठिकाणी भेट देण्याचा भाविकांचा प्रयत्न असतो. मात्र, यामुळे वाहनचालकांवर ताण येऊन अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहनतळाजवळ वाहनचालकांसाठी विश्रांती कक्ष उपलब्ध करून देण्याची गरज उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी व्यक्त केली. त्याचाही विचार आराखड्यात करावा, अशी सूचना विखे पाटील यांनी यावेळी केली. तर बार्शीचे आ. राजेंद्र राऊत यांनी भगवंत मंदिराचा विकास करण्याची मागणी केली. याबाबत विचार करण्याची ग्वाही विखे पाटील यांनी यावेळी दिली.

### अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखडा ३६८ कोटींचा

अक्कलकोट हे जिल्ह्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. येणाऱ्या भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीशी चर्चा करून अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा ३६८ कोटी रुपयांचा असून या आराखड्यांतर्गत वाहनतळ विकास, रस्ते विकास, शौचालय, बांधकाम, आरोग्य सुविधा, स्वच्छ व मुबलक पाणीपुरवठा, उद्यान विकास, विद्युतीकरणाची कामे आदि कामे करण्यात येणार असल्याची अशी माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी यावेळी दिली.

### आवताडे, परिचारक यांच्या सूचनांचा समावेश करा

पंढरपूर विकास आराखडा बनवत असताना यात्रा कालावधी व वर्षभर येणारे भाविक, परंपरा व गर्दी या दोन्ही स्वतंत्र बाबींचा विचार करून आराखड्यात नव्याने कामे समाविष्ट करावीत. पंढरपूरच्या आजूबाजूच्या गावांमधून यात्रा कालावधीमध्ये पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना वाहनतळापासून शहरात येण्यासाठी सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच, आ. समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्याशी समन्वय साधून त्यांच्या सूचनादेखील आराखड्यामध्ये समाविष्ट कराव्यात अशा सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

# चिखलीत वाहनाच्या धडकेत रानगवा ठार

✔ **चिखली** : जंगल परिसरातून राष्ट्रीय महामार्ग पार करणारा गवा अज्ञात वाहनाच्या धडकेत ठार झाल्याची घटना सोलापूर - पुणे महामार्गावर चिखली परिसरात शनिवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घडली. हा गवा ठार झाल्याची माहिती होताच परिसरातील नागरिकांची एकच गर्दी झाली. या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली.

ठार झालेला गवा साधारण ६ वर्ष वयाचा असून तो नर आहे. तो फिरत फिरत रात्री राष्ट्रीय महामार्ग पार करून शेतात जाण्याच्या प्रयत्नात असावा, असे वनविभागाने सांगितले. त्यावेळी एखाद्या वाहनाने त्याला जबर धडक दिली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. हा गवा ठार झाल्याची माहिती होताच घटनास्थळी एकच गर्दी झाली. नागरिकांनी या घटनेची माहिती तत्काळ वनविभागाला दिली. वनपरिक्षेत्राधिकारी सतीश उटगे, वनपरिक्षेत्र अधिकारी सागर जवळगी, वनरक्षक सुरेश कुर्ले व वनकर्मचारी यांनी घटनास्थळ गाठले. पंचनामा करून गव्याचा मृतदेह ताब्यात घेतला. हिवरे वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात आणून त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर मृतदेह वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरातच जाळण्यात आला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिमंडल अधिकारी, वनरक्षक, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच वन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.



# पालकमंत्री संपर्क कार्यालयात ११७ पैकी ६८ तक्रारींचा निपटारा

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील नागरिकांची प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्यासाठी महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे सोलापूर जिल्हा संपर्क कार्यालय नियोजन भवनात सुरू करण्यात आले आहे. या संपर्क कार्यालयाचे औपचारिक उद्घाटन राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यालयात११७ तक्रारी दाखल झाल्या होत्या तर ६८ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे.

यावेळी खासदार डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामीजी, आ. सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, रणजीतसिंह मोहिते पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, महापालिका आयुक्त शीतल तेली -उगले उपस्थित होते. जिल्ह्यातील विकास कामे तसेच सर्वसामान्य नागरिकांची प्रलंबित असलेली कामे तात्काळ मार्गी लावण्यासाठी पालकमंत्री यांचे सोलापूर जिल्हा संपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. कार्यालयाचा संपर्क क्रमांक ०२१७-२७३१००४ आहे. संपर्क कार्यालयाच्या समन्वयक म्हणून माढाच्या उपविभागीय अधिकारी ज्योती कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संपर्क कार्यालयात नागरिकांचे निवेदन स्वीकारण्यासाठी तहसिलदार वाकसे नागु हरीबा (भ्रमणध्वनी क्र. ९०९६७९२१४७) व तीन कर्मचारी व एक शिपाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आतापर्यंत पालकमंत्री संपर्क कार्यालयात ११७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यामध्ये ६८ अर्ज निर्गमित केले आहेत. ४९ अर्ज प्रलंबित आहेत.

# तुंगतच्या महिलांचा दारुबंदीसाठी पुढाकार ; ग्रामसभेत एकमताने ठराव मंजूर

✔ **पंढरपूर** : गावच्या विकासातमहिलांचासहभागवाढावा यासाठी तुंगत ग्रामपंचायतकडून प्रयत्न केले जात आहेत. समस्या मांडण्यासाठी महिलांना व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्याने गावातील व्यसनाधितेवर महिलांनी आवाज उठविला आहे.

महिलांच्या विशेष ग्रामसभेत दारुबंदीचा' ठराव एकमताने संमत करण्यात आला आहे.तुंगत येथे दारुविक्रीसाठी कोणताही शासनाचा अधिकृत परवाना देण्यात आलेला नाही. दारुविक्री करु नये यासाठी सुरूवातीपासूनच ग्रामपंचायतने कुणासही परवान्यासाठी परवानगी दिलेली नव्हती. परंतु सध्या अवैधिरित्या व खुलेआमपणे दारुविक्री सुरू आहे. व्यसनानिधतेमुळे कुटुंबात वाद होण्याचे प्रमाण वाढत आहे. निवडणूक, जत्रा, सार्वजनिक कार्यक्रमातही भांडणे होण्याचे प्रसंग घडले आहेत. त्यामुळे पंढरपूर तालुक्यात तुंगत संवेदनशिल गाव म्हणून ओळखले जाते. गावात शांतता प्रस्थापित होऊन गावाचा नावलौकिक वाढविण्यासाठी ग्रामपंचायतीकडून प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच महिलांच्या विशेष ग्रामसभेत दारुबंदीचा' ठराव एकमताने संमत करण्यात आला आहे.



### ■ संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल

दारुबंदी होण्यासाठी केलेल्या ठरावाची प्रत किंवा तक्रार आल्यानंतर अवैधरीत्या दारु विक्री सुरू असेल तर बंद करण्यात येईल. संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक पी.ए.मुळे.यांनी सांगितले.

### ■ दारुबंदीने कुटुंबांची वाताहात थांबेल

व्यसनाधिनता कमी करुन गावात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दारुबंदी केल्याने कुटुंबांची सर्वच बाबतीत होणारी वाताहात थांबणार आहे. व्यसनमुक्तीच्या दिशेने गावची वाटचाल सुरू आहे, असे सरपंच डॉ.सौ.अमृता रणदिवे यांनी सांगितले.

# गुरुनानक शॉपिंग सेंटर मधून दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : अज्ञात चोरट्याने गुरुनानक शॉपिंग सेंटर नवी पेठ येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीके.५१९७ ही हँडल लॉक करून ठेवलेली असताना चोरून नेली. ही घटना दि.११ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी नितीन दशरथ सुरवसे (वय-५०, रा.यश नगर भाग-१, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक दराडे हे करीत आहेत.




# वाढदिवसानिमित्त यलगुलवार यांचा सपत्नीक सत्कार

✔ **सोलापूर** : माजी आमदार, नॅब शिक्षण संकुलाचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांचा वाढदिवसानिमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गौरव समितीचे प्रमुख रमेश फुले, सदस्य देवेंद्र भंडारे, नगरसेवक नरसिंग कोळी, जेम्स जंगम, प्रा. नरसिंह आसादे, उद्योजक बाबु विटे, हाजीमलंग नदाफ, रामसिंग आंबेवाले, पांडुरंग चौधरी, रमेश लांबतुरे, माणिक यादव, वहीद नदाफ व आशा म्हेत्रे आदी उपस्थित होते. माजी आमदार प्रकाश यलयुलवार ११ जानेवारी रोजी वाढदिवस व तसेच ७५ व्या वर्षी पदार्पण असा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला.

# किसन जाधव यांचे निधन

✔ **श्रीपूर** : सोलापूर येथील पुणे नाका परिसरातील किसन गणपत जाधव (वय ७२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, पत्नी असा परिवार आहे. ते संतोष जाधव यांचे वडील होत.



# रेल्वेच्या डब्यात महिला प्रसुत; बाळ दगावले

✔ **सोलापूर** : रेल्वेतून प्रवास करित असताना विवाहिता डब्यातच प्रस्तुत झाली. बाळ आणि बाळंतीणीला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता बाळ उपचारापूर्वी दगावले. ही घटना तळवळ रेल्वे स्थानक ते सोलापूर या दरम्यान शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली.

मूळ राजस्थान येथे राहणारे दाम्पत्य बेंगलोर (कर्नाटक) येथे कामाला होते. राजस्थान येथे जवळच्या नातेवाईकाचे निधन झाल्यामुळे ते सर्वजण रेल्वेतून बेंगलोर ते राजस्थान असा प्रवास करीत होते.गर्भवती असलेली विवाहिता पहाटे तीन वाजेच्या सुमारास बोगीत प्रसुत झाली. आणि तिला कन्यारत्न झाले. त्यानंतर सर्व नातेवाईक तडवळ येथील रेल्वे स्थानकात उतरले. आणि बाळ आणि बाळंतीणीला घेऊन सोलापूर गाठले.

सकाळी सहा वाजेच्या सुमारास त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र एक दिवसाची कन्या (बाळ) उपचारापूर्वी मयत झाली. बाळंतिणीची प्रकृती सुखरूप असून तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून प्राथमिक तपास हवालदार चमके करीत आहेत.

# दुधनीत सिद्धरामेश्वरांचा अक्षता सोहळा संपन्न

✔ **अक्कलकोट** : दुधनीचे ग्रामदैवत शिवयोगी सिद्धेश्वर महाराज यांच्या यात्रेतील अतिशय महत्त्वाचा विधी असलेला अक्षता सोहळा शनिवारी दुपारी पावणे दोनच्या सुमारास दुधनी विरक्त मठाचे मठाधिपती डॉ. शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या अध्यक्षतेखाली भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

यावेळी यात्रेचे मानकरी यावेळी यात्रेचे मानकरी इरय्या पुराणिक, चन्नविर पुराणिक, सुगेश बाहेरमठ, महेश बाहेरमठ, शांतलिंग बाहेरमठ यांनी वेदोक्त पद्धतीने मंत्रोच्चार केला. प्रारंभी अक्षतेचे मानकरी ईरय्या पुराणिक यांच्या घरात पोथी-पुराण ग्रंथाची पूजा करण्यात आली. त्यानंतर सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीच्या सदस्यांच्या उपस्थितीत मल्लिकार्जुन मंदिरात महाआरती करण्यात आले. शिवयोगी सिद्धेश्वर महाराजांच्या योगदंडाचे प्रतीक असलेल्या मानाच्या पाच नंदीध्वज व श्रींची मूर्ती संमती कट्ट्याजवळ दुपारी सव्वा एक वाजता दाखल झाल्या. त्यानंतर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत येगदी, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे, शिवानंद माड्याळ यांच्या उपस्थितीत, देवस्थान पंच कमिटीचे सदस्य गिरमल्लप्पा सावळगी, सातलिंग परमशेट्टी, सिद्धाराम येगदी, प्रभुलिंग पाटील, सिद्धाराम मल्लाड यांच्या हस्ते सुगडी पूजन करण्यात आले. त्यानंतर अक्षता सोहळ्याचे मानकरी ईरय्या पुराणिक आणि चन्नविर पुराणिक सम्मती वाचनास सुरुवात केली.



यावेळी लक्ष्मीपुत्र पाटील, मल्लिनाथ म्हेत्रे, मलकाजप्पा अल्लापुर, शिवशरणप्पा हबशी, चंद्रकांत बबलाद, शिवानंद हौदे, बसण्णा धल्लू, शरणप्पा मगी, बसवराज शांतप्पा हौदे, गुरूशांत ढंगे, बाबा टक्कळकी, लक्ष्मीपुत्र हबशी, संतोष जोगदे, मल्लिनाथ येगदी, अतुल मेळकुंदे, प्रशांत लोणी, अंबण्णा निंबाळ, विश्वनाथ गंगावती, शांतलिंग गुडोडगी, नंदू संगोळगी, शिवानंद फुलारी, बसवराज हौदे, हणमंत कलशेट्टी, श्रीशैल माशाळ, दौलत हौदे, लक्ष्मीपुत्र भाईकट्टी, उमेश सावळसूर, अभिषेक पादी, सातलिंग अंदेनी, गुरुशांत वडेयर व भक्त उपस्थित होते. अक्षता सोहळा दरम्यान अनुचित प्रकार घडू नये म्हणून अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महेश रामेश्वर, पोलीसउप निरीक्षक रेवणसिद्ध काळे, हवालदार अजय भोसले, पोलीस नाईक नाबिलाल मियावाले, सुरेश लामजने, कॉन्स्टेबल सचिन गायकवाड, राजू खंडाळ यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# मंगळवेढ्यातील शेतकऱ्याच्या भल्यासाठी वैचारिक मतभेद बाजूला ठेवले : भालके

✔ सुराज्य/मंगळवेढा

दामाजी कारखान्याच्या निवडणुकीप्रमाणे सर्व निवडणुकीत समविचारींच्या माध्यमातून लढवण्याबाबत इथल्या मंडळींचा विचार घेऊन निर्णय घेतला जाईल मात्र विधानसभेचा निर्णय ज्येष्ठाच्या मार्गदर्शनाखाली होईल. पुढच्या काळात जे होईल ते शेतकऱ्याच्या भल्यासाठी होईल, शेतकऱ्याच्या भल्यासाठीच आमचे वैचारिक मतभेद बाजूला ठेवल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादीचे नेते भगीरथ भालके यांनी व्यक्त केले.

तालुक्यात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत समविचारी आघाडीतील विजयी सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार तालुक्यातील मारोळी येथे आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आ. प्रशांत परिचारक, दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील, उपाध्यक्ष तानाजी खरात, संचालक औदुंबर वाडेकर, भाजप तालुकाध्यक्ष गौरीशंकर बुरकुल, रेवणसिध्द लिगाडे, भारत बेदरे, भारत पाटील, रामेश्वर मासाळ, लतीफ तांबोळी, युन्नश शेख, रामेश्वर मासाळ, बसवराज पाटील, नितीन पाटील गुलाब थोरबोले, सुरेश कोळेकर, राजकुमार पाटील, खुदा शेख आदी उपस्थित होते. भालके म्हणाले की, दामाजी कारखान्याच्या निवडणुकीत इथल्या सभासद व शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र येण्याची भूमिका मांडली, त्यात राजकारण न करता इथल्या नेतेमंडळींची भूमिका ऐकून त्यात सहमती दर्शवली. सुत्रसंचालन भारत मुढे यांनी केले.

■ मंगळवेढ्यात समविचारी आघाडीतील ग्रा.पं.सदस्यांचा सत्कार



**सरपंचांनी सरकारच्या योजनेची अंमलबजावणी करावी : परिचारक**

माजी आ.प्रशांत परिचारक म्हणाले की, तालुक्यातील शेतकरी सभासदांसाठी आमचे राजकीय जोडे बाजूला ठेवले. गावपातळीवरील सरपंचांनी केंद्र व राज्य सरकारच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी योगदान द्यावे, आरोग्य, घरकुल व इतर अनेक योजना आहेत.त्यासाठी सरपंच हाच गावपातळीवरील पंतप्रधान आहे.

# कुर्डुवाडीच्या ९१७ मालमत्ता धारकांची संक्रांतीत होणार दिवाळी

## १९९० ते २०२२ चा संघर्ष संपणार : आ.शिंदे बंधूंना यश



✔ कुर्डूवाडी : कुर्डुवाडी येथील ९१७ मालमत्ताधारकांच्या प्रलंबित प्रश्नावरून नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशना मध्ये आ.संजयमामा शिंदे यांनी लक्ष वेधी सूचना मांडली होती. त्यानुसार कुर्डुवाडीतील ९१७ मिळकती वरील अतिक्रमने नियमकुल करण्याच्या निर्देशबाबाबत जिल्हा अधिकाऱ्यांनी मंगळवार दि.१७ रोजी प्रांत कार्यालय कुर्डुवाडी येथे मिळकत धारकांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी कॅम्प आयोजित केलेला आहे.

या कॅम्पवेळी आ. बबनदादा शिंदे, आ.संजयमामा शिंदे, उपविभागीय अधिकारी ज्योती कदम, भूमी अभिलेख उपाधीक्षक, तहसीलदार, दुय्यम निबंधक, मुख्याधिकारी उपस्थित राहणार आहेत. मालमत्ता धारकाकडील कागदपत्रे जमा झाल्यानंतर संबंधित जागेची पथकाकडून स्थळ पाहणी केल्यावर पंचनामा करून छाननी तक्ता जिल्हा अधिकारी कार्यालयाकडे पाठवला जाणार आहे. कुर्डुवाडी शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी उपस्थित राहून आपल्याकडील कागदपत्रे जमा करावीत असे आवाहन आ.संजय शिंदे यांनी केले आहे.

कुर्डूवाडी शहरातील ९१७ गाळे धारकांवर संक्रांत कोसळणार होती पण आ. संजयमामा शिंदे व आ.बबनदादा शिंदे यांच्या प्रयत्नामुळे ऐन सक्रांतीच्या सणात दिवाळी होण्याची शक्यता आहे. या गाळे धारकांना ती जागा कायमस्वरुपी मिळु शकते त्या जागेला गाळेमालकाचे नाव लागण्याचा लवकरच मुर्हूर्त लागू शकतो अशीही चर्चा होताना दिसत आहे. या मागणीला सातत्याने आ. बबनदादा शिंदे व आ. संजयमामा शिंदे यांना पुढाकार घेतल्याने हा निर्णय लवकरच निकाली लागू शकतो.



## विवेकच्या विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन भेट

✔ सोलापूर : श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विवेकवर्धिनी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इनरव्हील क्लब पंढरपूर मार्फत मुलींसाठी वेंडिंग मशीन व डिस्ट्रॉय मशीन अशा दोन मशीन भेट देण्यात आल्या.त्यावेळी कुमारवयीन मुला-मुलींसाठी स्वतंत्रपणे या वयात होणारे बदल व अशा बदलांना कशाप्रकारे सामोरे जावे याचे मार्गदर्शन क्लबच्या माजी अध्यक्षा मीरा परिचारक यांनी केले. महाविद्यालयात शिकत असताना विद्यार्थ्यांनी नेमके काय करावे, याविषयी माजी उपप्राचार्या व क्लबच्या माजी अध्यक्षा सुजाता यादगिरी यांनी मागर्दशन केले. केले. प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख उत्तरेश्वर मुंढे यांनी केले. अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये होते. कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार सलीम वडगावकर उपस्थित होते. या कार्यक्रमा साठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा वैशाली काशीद, उपाध्यक्षा अनुराधा हरिदास उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विवेक चौगुले यांनी केले व आभार भगवती शिंदे यांनी मानले. ार्यक्रमाचे नियोजन अविनाश कटकधोंड, प्रेमा पाटील यांनी केले.



## संस्काररूपी शिदोरी जीवनभर पुरेल : रणदिवे

✔ सोलापूर : जिजाबाई या आधुनिक युगातील दीपस्तंभ आहेत त्यांचे विचार समाजाला तारत आहेत, त्यातूनच विद्यार्थी रुपी जीवनाचे सोने होईल, संस्काररूपी शिदोरी त्यांना जीवनभर पुरेल, असे मनोगत ए.बी. रणदिवे यांनी व्यक्त केले. श्री नूतन प्रशालेमध्ये हुतात्मा दिन, राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिन स्वामी विवेकानंद जयंती, या त्रिवेणी संगम कार्यक्रम निमित्त ते बोलत होते. कार्यक्रमाचा प्रारंभ राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, व हुतात्म्यांना अभिवादन करून व प्रतिमा पूजन करून मुख्याध्यापक श्री एस एन शहापुरे सर यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जिजाऊ वेश धारण केलेले कुमारी मयुरी माशाळ, कुमारी चैताली देडे, ज्योती बिराजदार, शर्वरी मुडगी, गायत्री बिराजदार, यांनी जिजा बाईंचे पोवाडे ओव्या आणि त्यांचे विचार मांडले. शिक्षिका सौ पी एस आराध्ये यांनी आपले व्यक्त विचार व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी विवेकानंदा सारखी एकाग्रता बाळगावी, आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित ठेवावे, यातूनच आदर्श युवा पिढी घडेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एल के बिराजदार मॅडम यांनी केले. आभार एस.जी. कल्याण शेट्टी सर यांनी मांडले. जिजाऊ जयंती निमित्त विद्यार्थ्यांना पेढे भरवण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धा झाली.


## शहीद जवान संस्थेच्या वतीने जिजाऊ जयंती साजरी

✔ सांगोला : शहीद जवान संस्थेच्या वतीने नेहरू चौक येथे राजमाता जिजाऊ जयंती व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीला राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस माजी नगरसेविका स्वाती मगर यांच्या हस्ते पुष्पहार पण करण्यात आला व युवकांचे प्रेरणास्थान युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस अजय इंगोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रमुख उपस्थिती च्या इनरव्हील क्लबच्या सचिव स्वाती अंकलगी यांची होती. यावेळी ॲड.मिलिंद हिरफोडे, उत्तम चौगुले, संगीता चौगुले, ठोंबरे, राजू मगर, देवा मासाळ अजित जाधव, निलेश कसबे आदी उपस्थित होते.

## ॲथेलॅटिक्स स्पर्धेत अम्मार शेख द्वितीय

✔ सोलापूर : पुणे विभाग अंतर्गत आंतरशालेय व विभागीय स्तर क्रीडा स्पर्धा पुणे येथे नुकतेच झाल्या. त्यामध्ये राजेभाई उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स येथील सायन्स विभागाचा विद्यार्थी अम्मार मोहम्मद युसुफ शेख याने १०० मीटर ॲथेलॅटिक्समध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. त्याचे संस्थेचे अध्यक्ष फैज अहमद इनामदार, प्राचार्या सबिहा पीरजादे आदींनी अभिनंदन केले. त्याला जिब्राईल शेख, निशाद शेख व निसार शेच यांनी मार्गदर्शन केले.

## माजी महापौर सुभाष पाटणकर यांचे निधन



✔ सोलापूर : शहराचे माजीमहापौर सुभाष पाटणकर यांचे आज दुपारी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ७२वर्षाचे होते. १९९५,९६या काळात महापौर पद भूषविले होते. ते शरद पवार यांचे कट्टर समर्थक होते, नवीपेठ व्यापारी असोशिएनचे माजी अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १विवाहित मुलगा, १, मुलगी सुन नातवंडे असा परिवार आहे. मरणोत्तर त्यांनी नेत्रदान आणि आश्विनी महाविद्यालयात कुंभारी येथे त्यांचे रात्री ठिक आठ वाजता देहदान करण्यात येणार आहे. सध्या एम्प्लामेंट चौक येथील त्यांच्या निवासस्थानी पार्थिव देह ठेवण्यात आला आहे

# साऊंड ॲन्ड लेझर शोचे आता ऑनलाईन बुकींग

✔ सोलापूर : स्मार्ट सिटीच्या योजनेतून श्री सिध्देश्वर मंदिर परिसरात लाईट ॲन्ड साउंड शो कार्यान्वित करण्यात आला आहे. दररोज सायंकाळी ७ ते ७:३० मधे मराठी भाषेत व रात्री ८ ते ८:३० कन्नड भाषेत हा शो दाखविणेत येतो. आता या लेसर शोचे बुकींग महानगर पालिकेच्यावतीने ऑनलाईन करण्यात आले आहे.

लाईट ॲन्ड साउंड शो साठी तिकिटाची किंमत लहानांसाठी २०/- व मोठ्यांसाठी ३०/- आहे. दैनंदिन होणाऱ्या शो चे बुकींग नागरिकांना www.solapurcorproation.gov.in या वेबसाईटवरील होम पेजवर असणाऱ्या



Our Online Services Yrb Laser Show Booking या लिंकवर जाऊन करता येईल अथवा lasershow.solapurcorporation.org या लिंकवर जाऊन करता येईल. बुकींग ७ दिवस अगोदर करता येईल व एका वेळेस जास्तीत जास्त १० तिकिटे बुक करता येतील. ६) ऑनलाईन पैसे भरल्यानंतर पावती डाउनलोड करता येईल. UPI द्वारे देखील पेमेंट करण्याची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. पावतीची सॉफ्ट कॉपी किंवा ह्रड दाखवून नागरिकांना शो च्या ठिकाणी प्रवेश दिला जाईल.

ऑनलाईन पैसे भरल्यानंतर काही तांत्रिक अडचणींमुळे पावती डाउनलोड करता आली नाही तर नागरिकांना पावती परत डाऊनलोड करण्याची सुविधा देखील दिलेली आहे. नागरिकांना याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भर दिवसा ४७ हजारांची चोरी

✔ बार्शी : शहरातील संभाजीनगरमध्ये भरदिवसा घराचे कुलुप तोडून दागिने व रोख रक्कमेसहित ४७ हजारांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची घटना घडली आहे.

याबाबत सिध्देश्वर अभिमन्यू मुळे यांनी दिलेल्या फिर्यादीनूसार अज्ञात चोरांच्या विरोधात बार्शी शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. मुळे हे कुटूंबासह एकत्रात राहतात. १२ जानेवारी रोजी दुपारी त्यांची पत्नी ही शिवण क्लास करित जात असताना त्यांनी घरातील आतील दरवाज्याला कुलुप लावले. दुपारी १२.४५ वा. चे सुमारास घरी आल्या तेव्हा त्यांना घराचा मेन दरवाजा उघडा दिसला त्यानंतर त्यांनी आत जावुन पाहिले असता त्यांना घरातील सामान अस्ताव्यस्थ पडलेले दिसले. कपाटातील लॉकर उघडे दिसले. घरामध्ये चोरट्याने प्रवेश करत रोख २६ हजार रूपये, ९ हजारांची सोन्याची अंगठी, व इतर मिळून ४७ हजारांचा माल चोरट्यांनी लंपास केला आहे.

## युवा सेनेच्या माळशिरस तालुकाध्यक्षपदी काकडे

✔ पिलीव : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या माळशिरस तालुका युवा सेनेच्या अध्यक्षपदी पिलीव येथील सुभाष काकडे यांची तर उपाधक्षपदी डाकटर निलेश कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीनंतर काकडे व डॉ. निलेश कांबळे यांचा शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख अशोक घोंगडे, ज्येष्ठ नेते शयाम मदने, प्रा.शंकर शिंदे, दादासाहेब मदने, तुषार राऊत, अशोक बगाडे, आनंद पाटील, सागर शेंडगे, योगेश देशमुख, पिसे, दादासो काळे आदींच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. काकडे यांनी आपण पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणीकपणे पार पाडणार असुन तालुक्यात युवा सेनेच्या वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.



# कायदा साक्षरता काळाची गरज : ॲड.शेटे

✔ सुराज्य/बार्शी

आधुनिक काळात आपल्या देशातील कायद्याचे मुलभूत माहिती प्रत्येक नागरिकाला असणे गरजेचे आहे. कायदा साक्षरता ही काळाची गरज आहे असे मत विधिज्ञ प्रणाली शेटे यांनी व्यक्त केले.



बी.पी. सुलाखे वाणिज्य महाविद्यालयात चला कायदा साक्षर होऊया या विषयावर त्या बोलत होत्या. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालय अंतर्गत तक्रार निवारण समितीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ॲड.प्रणाली प्रशांत शेटे यांनी सर्वच प्रसार माध्यमातून महिला आणि सर्व नागरिकांचे कायद्याबाबत प्रबोधन आणि जागृती करण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.के.पाटील होते. यावेळी उपस्थित संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी कवीतेच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. एस.के.पाटील यांनी केले. पाहूण्यांचा परिचय प्रा.बरडे के.एस. यांनी करून दिला. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक ग्रंथपाल यादव जे. आर. यांनी आभार व्यक्त केले. तर प्रा. शिंदे. एम.पी. यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## पावणेतीन लाखांचे सोन्याचे दागिने लंपास

✔ सोलापूर : पावणेतीन लाखांचे सोन्याचे दागिने प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.३० ते ३१ डिसेंबर दरम्यान कराड ते सोलापूर बाळे प्रवासादरम्यान घडली.याप्रकरणी संग्राम वसंतराव पाटील (वय-३०, रा.येलूर, ता.वाळवा, जि.सांगली ,सध्या-बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे कराड ते सोलापूर बाळे दरम्यान प्रवास करत असताना फिर्यादी यांची पर्स मधील तीन तोळे सोन्याचे राणीहार, दोन तोळे सोन्याचे गंठण, आठ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र व डायमंड एक ग्रॅम वजनाची सोन्याची नथ असा एकूण २ लाख ४४ हजारांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. हा गुन्हा पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथून वर्ग होऊन आल्याने आज दाखल झाला आहे.

# कुडलचे संगमेश्वर देवस्थान हे सकारात्मक ऊर्जा स्त्रोताचे केंद्र : विखे-पाटील

✔ दक्षिण सोलापूर : या परिसरात आल्यानंतर एक सकारात्मक ऊर्जा मिळते म्हणूनच सुभाष देशमुख नेहमी या तीर्थक्षेत्रावर येतात हत्तरसंग कुडलचे संगमेश्वर देवस्थान हे ऊर्जा स्त्रोत असल्याचे मत राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले ते संगमेश्वर देवस्थान यात्रा कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी आमदार सुभाष देशमुख, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा परिषदेच्या प्रभारी सीईओ मनीषा आव्हाळे, ज्योती कदम, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य चनगोंडा हविनाळे, अण्णाराव बाराचारे, तहसीलदार अमोल कुंभार, गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, भाजपा तालुकाध्यक्ष रामाप्पा चिवडशेट्टी, शिवानंद पाटील आदी उपस्थित होते. विद्यार्थी आणि



भक्तांसाठी स्काय वाक जिल्हा नियोजन च्या माध्यमातून पूर्ण करू अशी ग्वाही नामदार विखे पाटील यांनी दिली. धारसंघ येथील शाळेतील विद्यार्थ्यांनी भीमा सिना नदी संगमावरून शाळेला येण्यासाठी आणि भाविकांना मंदिराला येण्यासाठी होडीतून यावे लागते, या ठिकाणी स्कायवॉक झाल्यास विद्यार्थी आणि भाविकांची सोय होणार असल्याचे निवेदन यावेळी शाळकरी विद्यार्थ्यांनी पालकमंत्र्यांन दिले होते, यास उत्तर देताना पालकमंत्र्यांनी ही ग्वाही दिली. याप्रसंगी आमदार सुभाष देशमुख यांनी या स्थळाचा पर्यटन म्हणून विकास करण्यासाठी बोटिंग सुरू करण्याची विनंती पालकमंत्र्यांना केली. याप्रसंगी नामदार विखे पाटलांनी भिमासिना संगम, हरिहरेश्वर मंदिर, संगमेश्वर मंदिर, पुरातन शिलालेख, सहस्त्रमुखी शिवलिंगाचे दर्शन घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगप्पा केरके यांनी केले तर मधुकर बिराजदार यांनी आभार मानले. या प्रसंगी अण्णाराव पाटील, यतीन शहा, हनुमंत कुलकर्णी, जगन्नाथ गायकवाड, हनुमंत पुजारी, सुरेश बगले, गुरांना तेली, भीमाशंकर नरसगोंडे, दिपाली व्हनमाने, षडाक्षरी बिराजदार, देवेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

## क्रिकेट खेळताना हाणामारी; तिघांवर गुन्हा

✔ सोलापूर : लहान मुले क्रिकेट खेळताना बॉल लागण्याच्या कारणावरून शिवीगाळ करत राहता व त्यांनी मारहाण केल्याप्रकरणी विश्वनाथ तमशेट्टी, सुवर्णा शेट्टी (दोघे.रा.भारतमाता नगर) यांच्यासह इतर तीन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि.१३ जानेवारी दरम्यान भारत माता नगर होटगी रोड येथे घडली. याप्रकरणी सिध्दाराम स्वामीनाथ तांबुळे (वय-५४, रा.भारत माता नगर, होटगी रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. लहान मुले क्रिकेट खेळत असताना फिर्यादीच्या पत्नीच्या डोक्यात बॉल लागल्याने फिर्यादी यांच्या घराशेजारी राहणारे वरील संशयित आरोपी यांनी शिवीगाळ करून मारहाण केली.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कटके हे करीत आहे.

## घरासमोर लावलेली मोटरसायकल लंपास

सोलापुर (प्रतिनिधी) घरासमोर हॅंडल लॉक करून पार्क केलेली मोटरसायकल चोरट्याने चोरून नेली. ही घटना दि.१२ जानेवारी रोजी सिल्वर ऑक्स अपार्टमेंट विजापूर रोड येथे घडली. याप्रकरणी अश्विनी श्रावण सोलापुरे (वय-२३, रा.सिल्वर ऑक्स अपार्टमेंट, नवीन आरटीओ, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास सहायक फौजदार चव्हाण हे करीत आहेत.

# यंत्रणाची जुळवा-जुळव झाल्यास गळीत हंगाम चालू करणार : पाटील

## ▶ स्वामी समर्थ साखर कारखान्यात मोळी टाकण्याचा कार्यक्रम

✔ अक्कलकोट : तालुक्यातील ऊस क्षेत्राचे सर्व्हे करुन यंत्रणाची जुळवाज़ूळव झाल्यास यंदाचा गळीत हंगाम चालु करणार असल्याचे कारखान्याचे अध्यक्ष सिद्रामप्पा पाटील यांनी केले. स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना दहिटणेचे १४ व्या गळीत हंगाम शुभारंभप्रसंगी अध्यक्ष सिद्रामप्पा पाटील हे बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार डॉ.जयसिध्देश्वर महास्वामीजी तर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते १४ व्या गळीत हंगाम मोळी टाकण्याचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कारखान्याचे उपाध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, संचालक संजीवकुमार पाटील, अप्पासाहेब पाटील, दिलीप पाटील, महेश पाटील, कारखान्याचे कार्यकारी संचालक अशोक मुलगे, शिवमूर्ती स्वामी, शिवानंद कोरपे,

**कारखान्यासाठी अप्पांनी मालमत्ता गहाण ठेवली : आ. कल्याणशेट्टी**

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, गेल्या आठ वर्षापासून बंद असलेली स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना चालु करण्यासाठी सिद्रामप्पा पाटील स्थावर मालमत्ता गहाण ठेवून शेतकऱ्यांच्या हितासाठी जिद्दीने चालु करीत आहेत. त्यांचे ऋण फेडण्यासाठी मी कटीबद्द आहे. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका हे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील जे निर्णय घेतील त्या पध्दतीने पार पाडणार आहेत.



महेश हिंडोळे, अप्पासाहेब बिराजदार, सिध्दप्पा गड्डी, सुरेश झळकी, देवेंद्र बिराजदार, सुनिल बंडगर, अंबण्णा भंगे, दिलीप शावरी, राजकुमार बंदीछोडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, अभियंता, हणंतराव रेड्डी, शिवसिध्द बुळ्ळा, बाबुशा कोरपे, अण्णाराव याबाजी, भिमाशंकर विजापुरे, सिध्दाराम बाके, जयशेखर पाटील, अप्पु कवटगीमठ, मल्लिनाथ देशेट्टी, शिवानंद पेडसंगे, सुधीर मचाले, प्रकाश पाटील, रमेश कवटगी, संजय याबाजी, सचिन थोरात, दयानंद पाटील, बसवराज माशाळे, प्रविण मगदूम, दिलीप मोरे, संतोष माशाळे, मन्सूर मुल्ला, अप्पू परमशेट्टी, बाबा टक्कळकी, कलप्पा गड्डी, निलप्पा विजापुरे, रामगोंडा बिराजदार, श्रीमंत कुंटोजी, अरविंद ममनाबाद, परमेश्वर झळकी, महादेव पाटील, आमसिध्द पुजारी, मल्लिनाथ नागशेट्टी, महेश पाटील, शिवानंद बाके, सहा.शेती अधिकारी खोबरे, प्रदीप जगताप, उमाकांत वाघमोडे, व्यंकटेश मंगरुळे, बसवराज निंबाळे, रवी रसनभैरे, अशोक वर्दे, जगदीश बिराजदार, अमर पाटील, एम.जी.पाटील, चौधरी, रमेश पुजारी, वसीम मुल्ला आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक कारखान्याचे संचालक शिवयोगी स्वामी यांनी केले तर सुत्रसंचालन जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे वसुली अधिकारी मल्लिनाथ दुलंगे यांनी तर आभार मल्लिनाथ भासगी यांनी मानले.



## उत्तर तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी : दडे

**सुराज्य/उत्तर सोलापूर :** उत्तर तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईमधून वगळण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी भाजप युवा मोर्चाचे उत्तर तालुका अध्यक्ष संभाजी दडे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना भेटून केली आहे. अतिवृष्टीमुळे, सतत पडणाऱ्या पावसामुळे उत्तर तालुक्यातील शेतकऱ्यांची खरीप पिके, फळे, भाजीपाला, नगदी पिके यांचे नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. यावेळी नान्नज शाखा अध्यक्ष संजय मुळे, जग्गू भोरे, भारततात्या बाँगे, श्रीकांत मुळे, अनिल भोसले, प्रताप टेकाळे, योगेश गवळी गावकरी उपस्थित होते.



## अमोलराजेंनी न्यासाची बांधणी उत्तमरित्या केली : हिंदूराव

**सुराज्य/अक्कलकोट :** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी न्यासाची बांधणी उत्तमरित्या केलेली असून आज जो बदल दिसत आहे. तो योग्यरित्या स्वामी भक्तांना आवश्यक असे करण्यात आल्याचे मनोगत सिडको नवी मुंबईचे माजी अध्यक्ष व राष्ट्रवादीचे नेते प्रमोद हिंदूराव यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मंडळाचे सचिव शामराव मोरे, पुरोहित अप्पू पुजारी, सिध्दाराम कल्याणी, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, शिवराज स्वामी, रुद्रय्या स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, निखिल पाटील, प्रसाद हुल्ले, गोटू माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.



## राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त वृद्धाश्रमास अन्नदान

**सुराज्य/सांगोला :** राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या ४२५ व्या जयंतीचे औचित्य साधून आमदार शहाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेबांची शिवसेना महिला आघाडी यांच्यावतीने मातोश्री वृद्धाश्रम येथे भेट देऊन तेथील वृद्ध नागरिकांना भोजन करण्यासाठी स्वेटर वाटप तसेच राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

या कार्यक्रमास राजलक्ष्मी पाटील, पंचायत समिती सदस्य वंदना गायकवाड, शोभा काकी देशमुख, सिमा इंगवले, पुनम सावंत, करुणा जांगळे, दिपाली माने, राणीताई चव्हाण, विद्या पवार, गायकवाड यांसह इतर महिला उपस्थित होत्या. वृद्धाश्रमातील नागरिकांना कधीही कोणतीही समस्या जाणवली तर आमदार शहाजी बापू पाटील यांच्यावतीने आम्ही सर्वजण कायम या वृद्ध नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असू, असे राजलक्ष्मी पाटील यांनी सांगितले.

## सामूहिक लोकनृत्य स्पर्धेत झेडपी शेटफळ शाळेचे यश

**सुराज्य/चिखली :** पापरी येथे घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय विद्यार्थी गुणवत्ता शोध चाचणीअंतर्गत सामुहिक लोकनृत्य प्रकारात शेटफळ जि. प. शाळा शाळेतील लहान गटाच्या चिमुकल्यांनी कोळीगीताचे सुंदर नृत्याविष्कार सादर करीत अव्वल स्थान पटकावले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी बहारदार धनगरी गीत सादर करीत तालुक्यातून दुसरा क्रमांक पटकाविला. चित्रकलेत वैष्णवी डोंगरे हिनेही तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी खेळाडूंना मुख्याध्यापिका उमा गुंड यांच्यासह संगीता पाटील, सुरेखा मोरे, शशिकांत जाडकर, सरिता थोरात, संतोष लोंढे, माधवी जोशी, सुवर्णा खडके, रजिया तांबोळी, मनिषा थोरात, रविंद्र देबडवार यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी मल्लिनाथ स्वामी, विस्तारअधिकारी विकास यादव, तानाजी देशमुख, श्रीकांत खताळ, रमेश खांडके, महादेव माने, शिक्षक नेते रणजित थिटे, नामदेव कुचेकर, शिवाजी शेटे यांनी अभिनंदन केले.

## मुस्लीम ब्रिगेडतर्फे खेळाडूंचा सत्कार

**सुराज्य/सोलापूर :** जिजाऊ जन्मोत्सवनिमित्ताने छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडच्यावतीने राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलेले खेळाडू आणि राज्यस्तरीय हँडबॉल खेळाडूंचा सत्कार छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेडच्यावतीने प्रगतशील शेतकरी दादा बोडके हस्ते करण्यात आला.

मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास मुस्लीम ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, मराठा सेवा संघाचे सुरेश ननवरे, राजू हुंडेकरी, रिजवान शेख, जावेद बद्दी, तन्वीर गुलजार, कादर भागानगरी, सरफराज शेख, सादिक मुजावर, कय्युम बलोलखान, अमजद पठाण, कय्यूम मोहळकर, अझहर खान यांच्यासह खेळाडूंचे पालक प्रशिक्षक आदी उपस्थित होते.

# पर्यायी व्यवस्था करुनच अतिक्रमण काढण्यात यावे; अन्यथा आंदोलन



**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट शहरातील तीर्थक्षेत्र विकासाच्या नावाने अडथळा नसलेले अतिक्रमण काढून सर्वसामान्यांच्या पोटावर पाय देण्याचे काम नगरपालिका प्रशासन व पोलीस करीत आहेत. ते तात्काळ थांबवण्यात यावे. खोकेधारकांची पर्यायी व्यवस्था करुनच अतिक्रमण काढण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा खोकेधारक संघर्ष समितीच्यावतीने देण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षात तीर्थक्षेत्र विकासाच्या नावाखाली शहरातील अडथळा नसलेले अतिक्रमण काढून रोजीरोटी हिसकावण्याचे काम करीत आहेत. ते तात्काळ थांबविण्यात यावे अन्यथा नगरपालिका प्रशासनाने खोकेधारकांच्या संतापाला सामोरे जावे लागेल. नगरपालिकेने खरंच अतिक्रमण होऊन रस्ते वहिवाटीस अडथळा येत असेल तर तात्काळ हटवावे. ज्या खोकेधारकांचे रस्त्याला अडथळाच होत नसेल तर ते अतिक्रमण का काढताय? काढताय तर त्यांचे पर्यायी व्यवस्था करुन अतिक्रमण काढा. अन्यथा कारवाई थांबवा. नाहीतर आमच्याकडे आंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचे खोकेधारक संघर्ष समितीने सांगितले.

यावेळी शिंदे गटाचे शहर प्रमुख योगेश पवार, प्रहार संघटनेचे शहर प्रमुख अमर शिरसट, प्रथमेश पवार, रशिद खिस्तके, शाम राठोड, अनिल सुरवसे, रजाक मकानदार, शौकत नाईकवाडी, शिवा पत्तरगी, आकाश गडकरी, मोसिन पठाण, इम्रान मुकादम, सिध्दाराम जाधव, प्रकाश राठोड, विशाल कलबुर्गी, शरणप्पा माळी, काशिनाथ माळगे, पुत्रप्पा आळगी, गंगाराम गायकवाड, सुरेश गायकवाड, आनंद हिळ्ळी, सुमित कारंडे, मोसिन पठाण, कृष्णा सासर, राहुल जोजन, विशाल जाधव, तन्वीर तांबोळी, मुबारक नाईकवाडी, स्वामीनाथ घोडके, चंद्रकांत कुंभार, मनोज निकम आदीसह मोठ्या संख्येने खोकेधारक उपस्थित होते.

## खोकेधारक संघर्ष समितीचा इशारा

अक्कलकोट नगरपरिषदेच्यावतीने काढण्यात येत असलेले अतिक्रमण तात्काळ थांबविण्यात यावे. व्यापाऱ्यांची यांचा पर्यायी व्यवस्था करुनच अतिक्रमण काढण्यात यावे. मंगरूळे चौक ते शिवपुरी या रस्त्याचे काम टेंडर होऊन मुदत संपले अद्याप देखील काम पूर्ण झाले नाही. या कामाकडे मुख्याधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. या विषयाकडे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जातीने लक्ष देऊन या विषयीचा तोडगा काढावा, असे रिपाइंचे तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी म्हटले आहे.

अतिक्रमण हे अतिक्रमण आहे आणि तो काढणे अनिवार्य आहे. येत्या सोमवारपासून अतिक्रमण मोहीम जोरदार राबविण्यात येणार आहे. अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण काढण्याची वाट न पाहता आपआपले खोके स्वेच्छेने काढून घ्यावेत अन्यथा होणाऱ्या नुकसानीला तेच स्वत: जबाबदार असतील, असा इशारा मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी दिला आहे.

## पालकच मोबाईलच्या आहारी गेल्याने मुलांचे भवितव्य अवघड : प्रा. शिंदे

**सुराज्य/मंगळवेढा :** सध्याच्या काळात आई-वडीलच मोबाईलच्या आहारी गेल्याने संस्कारीत,मुले कशी घडवणार, त्यांचे भवितव्य अवघड आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रीती शिंदे यांनी गरज जिजाऊच्या विचाराची या विषयावर बोलताना केले.

राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त श्रीराम फाउंडेशन व जिजाऊ ब्रिगेड यांच्यावतीने शहरातील विविध क्षेत्रातील गुणवंत महिलांचा सन्मान जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून करण्यात आला.अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲडमिनिस्ट्रेटर मीनाक्षी कदम या होत्या. यावेळी माजी जि. प. अध्यक्षा जयमाला गायकवाड, सुप्रिया जगताप, इंदुमती जाधव, अजित जगताप, प्रवीण खवतोडे, प्रा. विनायक कलुबर्गे हे उपस्थित होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील, लता शिकतोडे, विजया वाकडे, मंगल जाधव, सब्जपरी मकानदार, वर्षा दत्तू, आशा वाले, हसीना सुतार, स्मिता जडे, अवंती पटवर्धन, रागिनी कांबळे, सुरेखा खरात, लक्ष्मीबाई उप्पेवाड, ज्ञानेश्वरी महिला स्वयं साह्य बचत गट, बचत गट समन्वयक युन्नुस मोगल, राजेंद्र खताळ, प्रदीप सपकाळ, संयोगीनी बचत गट, संगीता रजपूत, सुनीता चव्हाण, आशा पाटील यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## जेल तोडून पळालेला आरोपी १४ वर्षांनी जेरबंद

**सुराज्य/कुर्डूवाडी**

**रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेचा १ लाख ४० हजारांचा ऐवज चोरून नेल्या प्रक्ररणी अटकेत असलेल्या फरार आरोपीस सुमारे १४ वर्षानंतर लोहमार्ग पोलिसांनी कुर्डूवाडी बसस्थानकातून अखेर केले जेरबंद केले.**

अमोल विश्वनाथ पारवे (वय ३५) रा. रणदिवेवाडी, ता. माढा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ९ जानेवारी २००७ रोजी फिर्यादी कुंदा शांतीलाल सुराणा रा. लंबाडी सिकंद्राबाद (आंध्रप्रदेश) या गाडी क्र. ७०३२ हैद्राबाद-मुंबई गाडीने एस. १२ बर्थ नं २७, २९ वरुन प्रवास करीत असताना मोहोळ ते कुर्डूवाडी स्थानकादरम्यान फिर्यादीचे सोन्याचे दागिने, कपडे असलेली सुमारे १ लाख ४० हजारांची बॅग चोरट्याने लंपास केली होती. या चोरीप्रकरणी दि. २२ मार्च २०१७ रोजी कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांनी रणदिवेवाडी येथील अमोल विश्वनाथ पारवे यास अटक करुन आठ दिवसांची पोलीस कोठडी दिली होती. कोठडीदरम्यान आरोपीने दि. २६ मार्च रोजी कोठडीचे गज वाकवून लॉकअपमधून पलायन केले होते. त्यामुळे आरोपीविरुध्द कलम २२४ भादंवि नुसार दुसरा गुन्हाही नोंद झाला होता. फरार आरोपीचा शोध लोहमार्ग पोलीस सतत १४ वर्षांपासून करत असताना आरोपी हा कुर्डूवाडी बसस्थानकावरुन बाहेरगावी जात असल्याची माहिती मिळाली.त्यानुसार कुर्डूवाडी लोहमार्ग पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पो.नि. अमोल गवळी, पो.ह.सलीम इनामदार, पो.कॉ. नवनाथ सावंत, प्रमोद शिंदे, वाहनचालक पो. ना. अमोल जाधव यांनी सापळा रचून सदर आरोपीस अटक करुन न्यायालयासमोर उभे केले असता त्याला दिवसांची कोठडी सुनावण्यात आली. अधिक तपास पो. ह. सलीम इनामदार हे करत आहेत.

## इप्पाकायल यांच्या स्मृतीला अभिवादन


**सुराज्य/सोलापूर:** येथील रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथ. शाळेत कै. रामदास इप्पाकायल यांची पुण्यतिथी पाळण्यात आली. पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी यांच्या अध्यक्षतेखाली उद्योगपती रंगनाथ येरमवार, शशिकांत अन्नलदास, लक्ष्मीनारायण गुर्रम व शाळेचे देणगीदार नरसय्या इप्पाकायल यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

**शिक्षक-पालक सभा**

मजरेवाडीतील भारत मराठी विद्यालयात शिक्षक-पालक सहविचारसभा पार पडली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस. के. सरसंबे हे होते तर उपाध्यक्ष ए. एच. कुरेशी हे होते. सहशिक्षिका टी. टी. वडावराव यांनी उपस्थित पालकांचे स्वागत व प्रास्ताविक केले.

## पैशाच्या कारणावरून फायटरने मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर :** पैशाच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी व फायटरने मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१३ जानेवारी रोजी सायं. ५.३० च्या दरम्यान जुना बोरामणी नाका येथे घडली. याप्रकरणी धनंजय श्रीनिवास गोपाळे (वय-४२, रा.जुना बोरामणी नाका, रविवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पिंटू सुर्वे (रा. हनुमान नगर) यांच्यासह तीन अनोळखी इसमाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.





गोपाळे हे वरील ठिकाणी असताना वरील संशयित आरोपी याने फिर्यादी धनंजय गोपाळे यांना, 'तु सागर कदम यांच्याकडून घेतलेले पैसे परत कधी देणार', असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर गोपाळे यांनी पिंटू सुर्वे याला मी पैसे परत देणार आहे, असे समजावून सांगत असतान मारहाण केली. पत्नी अर्चना व मुलगा यश, मुलगी प्रियांका हे भांडण सोडवण्यासाठी मध्ये आले असता त्यांना देखील मारहाण केली. पुढील तपास पोह. भोगशेट्टी हे करीत आहे.

**मृत्यूस कारणीभूत; एकावर गुन्हा**

मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एक जनाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१२ रोजी रात्री ९.४५ च्या दरम्यान शेंडगे वस्ती बेलाटी येथे घडली. याप्रकरणी पोना सौदागर सुभाष क्षीरसागर यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून उमापती निंगप्पा व्हनमाने (वय-३०, रा. मु. पो. नंदुर ता. उत्तर सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वरील संशयित आरोपी याने केगाव विजापूर रोडवर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल क्र. एम. एच.१३. डीजी. ४७३५ ही निष्काळजीपणाने चालवून स्वतः जखमी होऊन रस्ता ओलांडत असणाऱ्या इसमास धडक देऊन त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोह. उपासे हे करीत आहे.



## मिनी ऑलिंपिक स्पर्धेत नम्रताला तिहेरी सुवर्ण पदक

**सुराज्य/पंढरपूर :** नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रीडा संकुलमध्ये झालेल्या मिनी ऑलिंपिक स्पर्धेत 'सेपक टकरा' या क्रीडा प्रकाराच्या अंतिम सामन्यात सोलापूरच्या महिला संघाने नाशिक महिला संघाचा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. यामध्ये स्वेरीच्या नम्रता दिगंबर घुले हिने तीन गोल्ड मेडल मिळवले. याचबरोबर संघाची कर्णधार कल्याणी बिले, संचिता पवार, प्रणिता लेंडवे, भक्ती घुले व साक्षी शिंदे यांनी देखील उत्कृष्ट खेळ केला.

सुवर्णपदक मिळविलेल्या नम्रता घुले यांचा संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या हस्ते व प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. सतीश लेंडवे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, ग्रंथपाल वैशाली कदम यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज प्रा. एम. एम. पवार यांनी अभिनंदन केले.

## बसव ब्रिगेडचे शहर-जिल्हा पदाधिकारी जाहीर

### बसवेश्वरांचा संघर्षमय इतिहास पोहोचवणार युवकांपर्यंत : ॲड. भोसीकर

**सुराज्य/सोलापूर**

महात्मा बसवेश्वरांचा संघर्षमय इतिहास युवकांपर्यंत पोहोचवण्याची आवश्यकता आहे. त्या माध्यमातून लिंगायत समाजाची जनजागृती होणार आहे. याकरिता विविध उपक्रम, व्याख्याने या माध्यमातून बसव ब्रिगेडतर्फे विश्वगुरू महात्मा बसवेश्वरांचा संघर्षमय इतिहास युवकांपर्यंत नेण्याचे कार्य होणार आहे, असे प्रतिपादन बसव ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अविनाश भोसीकर यांनी केले.

बसव ब्रिगेड अखिल भारतीय लिंगायत युवा मंचच्या शहर जिल्हा पदाधिकाऱ्यांची घोषणा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अविनाश भोसीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



बसव केंद्रात झालेल्या या कार्यक्रमाच्यावेळी श्रीशैल हत्तुरे, बसव केंद्राचे ॲड. शिवशंकर काडादी, छत्रपती फाऊंडेशनचे संतोष पवार, सामाजिक कार्यकर्ते खलील शेख, धोंडप्पा तोरणगी, पंडित जवळकोटे, बसव ब्रिगेडचे शहर अध्यक्ष अमित रोडगे, सोलापूर दक्षिण विभाग अध्यक्ष जतिन निमगाव उपस्थित होते.

यावेळी संस्कृत विषयात पुणे विद्यापीठात प्रथम आलेल्या पर्जन्या अंजुटगी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मल्लिकार्जुन मुलगे, महादेवी तेली, सहसचिव निनाद वळसंगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक बसव ब्रिगेडचे शहर अध्यक्ष अमित रोडगे यांनी केले. सूत्रसंचालन मयूर स्वामी यांनी तर आभार बसव ब्रिगेडचे शहर उपाध्यक्ष प्रा. शिवलिंग अचलेरे यांनी केले.

**बसव ब्रिगेडचे नवनियुक्त पदाधिकारी पुढीलप्रमाणे :**

शहर कार्याध्यक्ष : बसवराज चाकाई, शहर उपाध्यक्ष : प्रा. शिवलिंग अचलेरे, सचिन चौगुले, सिद्धार्थ रंगापुरे, शहर संघटक : शरणकुमार कुंभार, शहर कार्यवाह : शिवराज विभूते, शहर कोषाध्यक्ष : नितीन गंगदे, शहर सचिव राहुल जत्ती, शहर विधी सल्लागार ॲड. विनयकुमार कटारे, शहर सहसचिव : अजिंक्य उप्पीन, प्रसिद्धी प्रमुख : विशाल पाटील, बाणेगाव अध्यक्ष : कृष्णा पाटील, दक्षिण सोलापूर उपाध्यक्ष : कांतेश बिज्जरगी, गुरुराज आलुरे, सिद्राम छपेकर, नागनाथ व्हनमाने, दक्षिण सोलापूर सचिव : संतोष हिरोळी, सहसचिव : योगीराज किनगी, तीर्थ अध्यक्ष : श्रीशैल रोडगे, उपाध्यक्ष : दिलीप चितळे, सचिव : निनाद वळसंगे, सदस्य : रमेश बंगुरगे.

## कॅनॉल जमिनीचा मोबदला मिळत नसल्याची तक्रार

**सुराज्य/सोलापूर :** बार्शी तालुक्यातील आगळगाव येथील जमीन कॅनॉल कामासाठी अधिग्रहीत करण्यात आली आहे. मात्र, चार गुंठे जागा घेऊनही शासन दरबारी याची नोंद नाही. मोबदलाही मिळत नाही. चौकशी करण्यास गेले असता तुमची फाईल गहाळ झाली असल्याचे त्यांना सांगण्यात आले. तात्काळ मोबदला द्यावा, अशी मागणी शेतकरी सुनील सुभाष डमरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शेतकरी सुनील सुभाष डमरे यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन आपली व्यथा मांडली. बोरी मध्यम प्रकल्प उपविभाग सोलापूर येथील कार्यालयातील अधिकारी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करण्यास तयार नाही. उडवा उडवीची आणि उद्धट उत्तरे देतात, असे त्यांनी सांगितले. यापूर्वीही जमीन अधिग्रहित केली त्यावेळी अशीच दप्तर दिरंगाई आणि उशीर झाला होता. दरम्यान, कारवाई कार्यवाही टाळण्यासाठी जन माहिती अधिकारी आयोगाला खोटी माहिती आयोगाला सादर करून आयोगाची फसवणूक केली बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सुनील डमरे यांनी केली.

# करवतीने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले

## शवविच्छेदन अहवालात धक्कादायक खुलासा


✔ सुराज्य/नवी दिल्ली

**श्रद्धा वालकर हत्या प्रकरणात आता श्रद्धाचा शवविच्छदेन अहवाल समोर आला आहे. ज्यामध्ये आफताबने श्रद्धाची गळा दाबून हत्या केल्यानंतर करवतीने तिच्या मृतदेहाचे तुकडे केले होते, ही धक्कादायक बाब उघड झाली आहे. श्रद्धा वालकरच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करण्यात आले होते. ते तुकडे आफताब रोज जंगलात फेकत होता. महारौलीचं जंगल आणि गुरूग्राम या ठिकाणी तो हे तुकडे फेकत होता. आफताबला अटक केल्यानंतर जे हाडांचे तुकडे त्या ठिकाणी मिळाले, त्या हाडांवरून शवविच्छेदन अहवाल काढण्यात आला.**

आफताबला अटक केल्यानंतर त्याची कसून चौकशी करण्यात आली. त्याने कुठे कुठे श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे फेकले ते पोलिसांना सांगितलं. त्यानंतर पोलिसांना एकूण २३ हाडं मिळाली. यावरूनच शवविच्छेदन अहवाल तयार करण्यात आला. यामध्येच हा धक्कादायक खुलासा झाला आहे की आफताबने करवतीने श्रद्धाच्या मृतदेहाचे तुकडे केले होते. या प्रकरणी पोलीस जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात कोर्टात चार्जशीट दाखल करणार आहेत.

**श्रद्धाच्या हाडांवर मिळाल्या करवतीने कापल्याच्या खुणा**

जेव्हा कोणतीही गोष्ट करवतीने कापली जाते तेव्हा त्याची खूण मागे राहतेच. कारण कापला जाणारा भाग काहीसा खडबडीत राहतो. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार श्रद्धाच्या हाडांवर अशाच खुणा मिळाल्या आहेत. एकूण २३ हाडाचं निरीक्षण केल्यानंतर हा अहवाल देण्यात आला आहे की श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करवतीने करण्यात आले आहेत.



**श्रद्धा आफताबसोबत लग्न क रण्याचे स्वप्न पाहात होती**

श्रद्धाने आई वडिलांच्या विरोधात जात आफताबसोबत आपलं आयुष्य जगण्यास सुरूवात केली होती. तीन वर्षे लिव्ह इन मध्ये राहिल्यानंतर आता आपण लग्न करावं असं श्रद्धाला वाटत होतं. मात्र, तिला हे ठाऊक नव्हतं की ज्या आफताबसोबत आपण सात जन्माचं बंधन बांधायची स्वप्नं पाहतो आहे तो माणूस नाही हैवान आहे.

श्रद्धा आफताब सोबत सुखी संसाराची स्वप्न पाहात होती. तिकडे आफताब तिच्या हत्येचा कट रचत होता. या दोघांमध्ये बऱ्याचदा खटके उडत होते. मात्र, प्रेमी युगुलांमध्ये वाद होणं, खटके उडणं हे काही विशेष नाही. आफताब माफी मागायचा, तिला समजवायचा ती ऐकायची.

मात्र, या सगळ्यामागे आफताब आपल्या हत्येचा कट रचतोय याचा साधा संशयही श्रद्धाच्या मनाला शिवला नाही. अनेक महिने व्यवस्थित कट रचल्यानंतर आफताबने श्रद्धाची हत्या केली आणि हत्येनंतर तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले.

Bumble या डेटिंग ॲपवर श्रद्धा वालकर आणि आफताब पूनावाला या दोघांची ओळख झाली होती. २०१८ मध्ये या दोघांची ओळख झाली. डेटिंग ॲपच्या माध्यमातून २०१९ ला दोघं भेटले. त्यानंतर लिव्ह इनमध्ये राहात होते.

श्रद्धा हत्याकांड प्रकरणात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आफताब पूनावालाने ही कबुली दिली आहे की रक्त स्वच्छ कसं करायचं हे आफताबने गुगलवर शोधलं होतं. तसंच माणसाच्या शरीराचे तुकडे कसे करायचे हेदेखील त्याने शोधलं होतं. पोलिसांनी आफताबला अटक केल्यानंतर त्याचा मोबाईल तपासला तेव्हा त्यांना या सगळ्याची सर्च हिस्ट्री मिळाली होती. आता श्रद्धाची हत्या केल्यानंतर आफताबने तिच्या मृतदेहाचे तुकडे करवतीने केले होते, अशी माहिती समोर आली आहे.

---

# तेरा वर्षापूर्वी मयत झालेल्या महिलेच्या नाववरील जमीन खरेदी

## मोहोळ पोलिसात पाच जणावर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/मोहोळ

१३ वर्षांपूर्वी मयत असलेल्या महिलेच्या नाववरील कुरुल ( ता. मोहोळ ) येथील जमीनीची बनावट कागदपत्रे तयार करून खरेदी केल्या प्रकरणी मोहोळ पोलिस ठाण्यात पाच जणावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे



याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहीती नुसासार कुरुल येथील वनमाला विठठलराव गोळे यांच्या नाववर कुरुल येथील गट नं ९९२ मध्ये पाच हेक्टर ४८ आर येवढी जमीन आहे या जमीनी ची खरेदी २ ऑगस्ट २०२२ रोजी व्यवहार करण्यात आला वस्तुतः वनमाला गोळे या २४ सप्टेंबर २००९ रोजी तेरखेडा ता वाशी जिल्हा उस्मानाबाद येथे मयत झाल्या आहेत. याची माहिती असून सुद्धा त्यांच्या जागी दुसरी महिला उभी करून तिचे बनावट आधार कार्ड तयार करून सदर जमीनीची खरेदी विक्री करण्यात आली . १३ वषापूर्वी मयत झालेल्या वनमाला गोळे यांचे वारसदार विशाल गोळे यांनी आपली व शासनाची फसवणूक झालेने महेश मोहन जाधव रा . देवळे ता. सांगोला व खरेदी खतातील साक्षीदार आबासाहेब सुधाकर पवार रा अंकोली ता मोहोळ व दत्तत्रय हणमंत सुरवशे रा रांझणी ता पंढरपूर एक अनोळखी महीला व एक एजंट दलाल अशा पाच जणावर मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याची फिर्याद मोहोळचे दुय्यम निबंधक धनंजय गोरे दाखल केल्याने अधिकच खळबळ उडाली आहे. मयत वनमाला गोळे यांचे वारस बाहेरगावी राहतात याची माहीती घेवून हा प्रकार झालेची चर्चा आहे.

# एटीएमचे कार्ड चोरून ७३ हजार रुपये पळवले

✔ सुराज्य/सोलापूर

लग्नाच्या घाई गडबडीत कोणीतरी एटीएम कार्ड पळविले आणि त्या कार्डचा वापर करून वृद्ध इसमाच्या खात्यातून ७३ हजार रुपये काढून नेल्याची घटना नरोटेवाडी (ता. उत्तर सोलापूर) येथे नुकतीच उघडकीस आली. यासंदर्भात विठ्ठल कांबळे (वय ७७ रा. नरोटेवाडी) यांनी तालुका पोलिसात चोरीची फिर्याद दाखल केली. विठ्ठल कांबळे यांच्या भावाच्या घरी लग्नकार्य असल्यामुळे नातेवाईक आणि इतर लोक त्यांच्या घरी आले. या दरम्यान त्यांच्या घरातून एटीएम कार्ड चोरीस गेले आणि चोरट्याने त्या कार्डचा गैरवापर करून कांबळे यांच्या खात्यातून ७३ हजार रुपये काढून घेतले. दरम्यान कांबळे यांनी नान्नज येथील बँकेत जाऊन कार्ड हरवल्याशी तक्रार दाखल केली. तेंव्हा त्यांना २५ ते २७ डिसेंबर या दरम्यान खात्यातून पैसे गायब झाल्याचे दिसून आले. पुढील तपास हवालदार चव्हाण करीत आहेत.




**मेंढापूर येथे मोटारीतून शेळ्या पळविल्या**

मेंढापूर (ता. पंढरपूर) येथे राहणाऱ्या चांगदेव महादेव गोरे यांच्या पत्राशेडमध्ये बांधलेल्या ५ शेळ्या आणि १ बोकड अशी ३७ हजाराची जनावरे चोरट्याने मोटारीतून पळून नेले. ही घटना शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. चोरट्याने जनावरांचे पत्राचे उघडून त्यातून पाच शेळ्या आणि एक बोकड असा अशी ३७ हजाराची जनावरे चौघा चोरट्यांनी काळ्या रंगाच्या मोटारीतून येथून पळून नेले. गोरे यांनी यासंदर्भात करकंब पोलिसात फिर्याद दाखल केली. हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

**वटवटे येथे शेतीच्या वादातून चाकूने मारहाण**

वटवटे (ता. मोहोळ) येथे शेतीच्या वादातून चाकू आणि काठीने केलेल्या मारहाणीत अमर हरी कांबळे (वय २६)हा तरुण जखमी झाला. ही घटना गुरुवारी सायंकाळच्या सुमारास वटवटे गावात घडली. त्याला कामती येथे येथे प्राथमिक उपचार करून पुष्पा (आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याला हसन बादशहा मुलानी आणि इतर ५ जणांनी मारहाण केली, अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

**कुरनूर येथे सळईने मारहाण**

कुरनूर (ता. अक्कलकोट) येथे पैशाच्या वादातून सळई आणि काठीने केलेल्या मारहाणीत तौसिफ मगदूम पठाण (वय २५) हा जखमी झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सैपन सिकंदर पठाण, अशपाक पठाण आणि अन्य दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

**नशेत काच फोडल्याने तरुण जखमी**

दारूच्या नशेत आणि पैशाच्या वादातून घरातील काच फोडल्याने दोन्ही हाताला जखम होऊन तरुण जखमी झाला. ही घटना उत्तर सदर बाजार परिसरातील नळ बाजार येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. रोहित बजरंग बलरामवाले (वय २५) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे .



# बालिका सक्षमीकरण अभियानाचा एनटीपीसी येथे समारोप

✔ सुराज्य/सोलापूर

एनटीपीसी सोलापूर येथे दिनांक ५ ते १२ जानेवारी २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या बालिका सक्षमीकरण अभियानाच्या हिवाळी कार्यशाळेचा सोलापूर येथील ए.पी.जे.अब्दुल कलाम स्टेडियमवर समारोप करण्यात आला. श्रीमती विजया राव, अध्यक्षा (सृजन महिला मंडळ) यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि बालिका सक्षमीकरण मोहिमेतील सहभागींना शुभेच्छा दिल्या.

आठवडाभर चाललेल्या हिवाळी कार्यशाळेच्या समारोप्रसंगी ए.पी.जे. अब्दुल कलाम स्टेडियमवर फुटबॉल सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर मुलींनी त्यांच्या हिवाळी कार्यशाळेच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून तयार केलेल्या इंग्रजी भाषेतील लघुकथा सुंदरपणे सांगण्यात आले. कार्यक्रमादरम्यान, राजीव अकोटकर, जीएम (ओ एम), नंदा किशोर, जीएम (आरएलआय), मनोरंजन सारंगी (एचओएचआर), आणि सृजिना महिला मंडळाचे वरिष्ठ सदस्य देखील उपस्थित होते. शिकण्याच्या प्रक्रियेत सातत्य राखण्यासाठी परिघीय गावांमध्ये राहणाऱ्या ४० शाळकरी मुलींसाठी आठवडाभराचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. संभाषण, खेळ, कथालेखन, सॉफ्ट स्किल्स यासारख्या उपक्रमांचे शैक्षणिक सोबतच नियोजन करण्यात आले आहे.

# पीकविम्यापासून एकही शेतकरी वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्या

✔ सुराज्य/वैराग : सोलापूर येथे जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत उपस्थित राहून खा. ओम राजेनिंबाळकर यांनी महत्त्वाचे मुद्दे मांडून पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री महोदय यांच्याकडे विनंती केली.



शिराळे येथील फटाका कारखान्याच्या स्फोटामध्ये निधन तसेच गंभीर दुखापत झालेल्या नागरिकांना लवकरात लवकर मदत जाहीर करावी तसेच कारखान्याच्या जवळपास कांदा व इतर पिके होती. या स्फोटामुळे नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई मिळावी, सन २०२१ खरीप हंगामात बार्शी तालुक्यात सततच्या पावसाने नुकसान झालेल्या पिकाच्या नुकसान भरपाईपासून वंचित ४ मंडळातील शेतकरी बंधूंना धाराशिव जिल्ह्यात जशी नुकसानभरपाई दिली त्याचप्रकारे शासन निर्णयाचा आधार घेऊन मदत तात्काळ वाटप करावी, सन २०२२ च्या खरीप हंगामात सततच्या पावसाने शेती पिकाचे नुकसान झाले शेतकऱ्यांनी नुकसान झालेल्या तक्रारी देखील विमा कंपनीला दिल्या पण नुकसान भरपाई देताना शेतकरी वर्गाला एकाच गटात शेती असणाऱ्या भावांना देखील असमतोल केला. त्यामुळे विमा कंपनीने केलेले पंचनामे पडताळून पहावे व शेतकरी वर्गावर झालेला अन्याय दूर करावा पीकविम्यापासून एकही शेतकरी वंचित राहणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी, बार्शी तालुक्यातील मंजूर मातोश्री पाणंद रस्ताच्या कामाचा जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा घ्यावा आदी मागण्या निंबाळकर यांनी केल्या.

# एकतपूर येथे तरूणाचा गुप्तांग कापून खून

✔ सुराज्य/सांगोला : सांगोला तालुक्यातील एकतपुर येथील संजय तुकाराम इंगोले (वय ३४) याचा अज्ञात कारणावरून गुप्तांग कापून निर्गुण खून केल्याची घटना शुक्रवार मध्यरात्री घडली. शनिवारी पहो सांगोला पोलीस स्टेशनचे सपोनी हेमंत कुमार काटकर व त्यांचे सहकारी सांगोला ते लोटेवाडी दरम्यान एकतपुर आचकदानी मध्यरात्री दोनच्या सुमारास एकतपुर आचकदाणी रोडवर गस्तीवर असताना रस्त्याच्या कडेला एक करून मृत अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती गस्त अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना त्वरित दिली उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी सपोनी प्रशांत हुले आदी पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तेथील परिस्थिती पाहता निर्गुण खून झाल्याचे आढळून आल्याने तपासा करतात तीन पथके पाठवण्यात आली. त्या पथकामार्फत काही जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.



# समूह नृत्य स्पर्धेत भगतवस्ती जि.प. शाळेची बाजी

✔ सुराज्य/सोलापूर : जिल्हा परिषद सोलापूरच्या शिक्षण विभागाने १३ जानेवारी रोजी माळशिरस तालुक्यातील समूहनृत्य स्पर्धा मोठा गट या स्पर्धेचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेश नगर अकलूज येथे केलेले होते. या स्पर्धेमध्ये केंद्रस्तरावर प्रथम क्रमांक केलेल्या २० गीतांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भगतवस्ती शाळेने प्रथम क्रमांक पटाविला.

महाळुंग नगरपंचायतीचे नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, नगरसेवक तानाजी भगत व त्यांच्या पत्नी सुमित्रा भगत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा व सर्वशिक्षकांचा सत्कार केला. याप्रसंगी शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रियांका भगत, उपाध्यक्ष अमीर मुलाणी, सदस्य महावीर जगताप व शाळेच्या परिसरातील पालक मंडळी उपस्थित होते. या गीतासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका परवीन तांबोळी, अलका भिंगे, विलास सांगवी, मोहिनी कलढोणे, राजेंद्र लोहार तसेच कथाकार गणपत जाधव, विनोद ननवरे, लता धांईजे या सर्व शिक्षकांनी कष्ट घेतले तर तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, अकलूज बीटचे विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे, महाळुंग केंद्राचे केंद्रप्रमुख नितीन साने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मराठी साहित्यात सोलापूरच्या संत, साहित्यिकांची मोलाची कामगिरी : पालकमंत्री विखे-पाटील

## सोलापूर ग्रंथोत्सव २०२२चे उद्घाटन

✔ सुराज्य/सोलापूर

**राज्य शासनाच्यावतीने ग्रंथालय चळवळीला उभारी देण्यासाठी जिल्हाजिल्ह्यात ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्याचा महत्त्वाचा निर्णय असून, त्या त्या जिल्ह्यातील साहित्यिकांचे योगदान व साहित्यसंस्कृती पुढे नेण्याचे काम ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून होत आहे. साहित्यसंस्कृतीत सोलापूरचा वाटा मोठा असून, मराठी साहित्यात सोलापूरच्या संतांनी, साहित्यिकांनी मोलाची कामगिरी बजावली आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी शनिवारी येथे केले.**

सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्यावतीने आयोजित सोलापूर ग्रंथोत्सव २०२२च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. आमदार सुभाष देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शिवछत्रपती शिवाजी महाराज, सांस्कृतिक भवन, (रंगभवन) येथे आयोजित या ग्रंथोत्सवास आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे डॉ. रणधीर शिंदे, शहाजी पवार, शिवाजी शिंदे, राजेंद्र भोसले, आप्पासाहेब पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, जिल्हा ग्रंथोत्सव समितीचे सदस्य उपस्थित होते.



ग्रंथोत्सव २०२२ चे उद्घाटन झाल्याचे व सोलापूरच्या साहित्यिकांचे योगदान जनतेपर्यंत नेण्याचे काम ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून होत आहे, असे सांगून पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, 'संतसाहित्याचे अभ्यासक, साहित्यिक, लेखक वेगळ्या विषयाच्या माध्यमातून साहित्यक्षेत्राला वेगळी ऊर्जा देण्याचे काम करत आहेत. हा ठेवा सोलापूरकरांच्या माध्यमातून राज्याला आणि देशाला लाभला असून, हा ठेवा जतन करून, आपल्या विचार, आचाराने समाजाला सुपूर्द करावा. राज्यातील प्रत्येक गाव पुस्तकांचे गाव व्हावे, असे सांगितले.'

प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले. आभार प्रमोद पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन भीमाशंकर बिराजदार यांनी केले.

यावेळी पालकमंत्री विखे-पाटील यांनी ग्रंथोत्सवांतर्गत उभारण्यात आलेल्या पुस्तकांच्या स्टॉलला भेट देऊन पाहणी केली. या ग्रंथदिंडीत शहरातील ज्ञान प्रबोधिनी, सेंट जोसब विद्यालय, वसंतराव नाईक सुयश विद्यालय, ज्ञानसंपदा कन्या प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, हांचाटे विद्यालय या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बालवीर वाचनालयाचे वारकरींचे पथक, ग्रंथालय कार्यकर्ते संतोष जाधव, सुनील दावडा, शिवाजी शिंदे, अहमद बांगी, ग्रंथालय निरीक्षक प्रमोद पाटील, प्रदीप गाडे, सदाशिव बेडगे, पद्माकर कुलकर्णी, येळेगावकर, अरविंद जोशी, डॉ. भीमाशंकर बिराजदार, प्रा हरीदास रणदिवे, तसेच ग्रंथालय कर्मचारी व पदाधिकारी व ग्रंथप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मतदान मागण्यासाठी आल्यास रस्त्याच्या खाली उतरू देणार नाही

**बेघर झालेल्या संतप्त मराठा महिलांचा इशारा**

✔ सुराज्य/परंडा : तालुक्यातील खासापुरी गाव महाराष्ट्राच्या नकाशावरून नामनेश झाल्याने अडीच हजार लोकसंख्येचे गाव होतेचे नव्हते झाले आहे. खासापुरी येथील १५० मराठा कुटुंब ४० मुस्लीम कुटुंब १०९ दालीत कुटुंब असे ३०० कुटुंबांचा संसार उघड्यावर पडले आहे. घराचा प्रश्न मार्गी लागला नाही. त्यामुळे मतदानावर बहिष्कार घालणार असून एकाही राजकीय पुढाऱ्याला मतदान मागायला आल्यास रस्त्याच्या खाली उतरू देणार नाही, असा इशारा बेघर झालेल्या संतप्त मराठा महिलांनी दिला आहे.

जिल्हा प्रशासनाने १०९ भूमीहीन दलित कुटुंबांसाठी ४ एकर जमीन खरेदी करून रमाई घरकुल आवास योजनेतून घरकुल देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, उर्वरीत जवळपास २०० बेघर झालेल्या कुटुंबासाठी प्रशासनाकडून कुठलीच मदत जाहीर केली नाही. यामुळे २०० कुटुंबांचा उघड्यावर पडला आहे. घराचा प्रश्न मार्गी न लावल्यास दि. २० रोजी तहसील कार्यालयात तळ ठोकणार असा इशाराही यावेळी दिला आहे.

# बोला एकदा हर्ऽऽ बोला हर्ऽऽ

## • अक्षता सोहळ्याला भक्तांचा सागर लोटला



✔ सुराज्य/सोलापूर

**सिध्दरामेश्वर यात्रेतील सर्वात महत्वाचा अक्षता सोहळा शनिवारी पारंपारिक पध्दतीने उत्साहात पार पाडला. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी सोलापूरसह, कर्नाटक, आंध्रमधील हजारो भाविकांनी गर्दी केली होती. यंदा अक्षता सोहळा वेळेत पार पाडण्याचे नियोजन श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटी, मानकरी आणि नंदीध्वजधारकांनी केले होते. अक्षता सोहळ्यासाठी संमती कट्टा परिसरात भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. मात्र नियोजित वेळेपेक्षा १ तास १५ मिनिटे अक्षता सोहळा उशीरा पार पडला. नंदीध्वजांचे आगमन होणार असल्यामुळे संमती कट्टा परिसर भाविकांनी फुलून गेला होता. यामध्ये शहरातील भाविकांप्रमाणे ग्रामीण भागातूनही हजारो भाविकांची गर्दी झाली होती. बोला बोला एकदा हर्ऽऽ बोला हर्ऽऽ श्री सिध्देश्वर महाराज की जय' अशा जयजयकाराने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.**

दुपारी १ वाजून ३० मिनिटांपासून नंदीध्वजांची मिरवणूक संमती कट्ट्यावर येण्यास सुरुवात झाली. तेव्हा बाराबंदी पोशाखातील नंदीध्वजधारकांनी संमती कट्टा भरून गेला होता. नाशिक ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. श्री सिध्देश्वरांच्या पालखींचे २ वाजून ५ मिनिटांनी आगमन झाले. आणि ज्यांची उपस्थितांना प्रतीक्षा लागली होती त्या मानाच्या सातही नंदीध्वजांचे डौलाने व वैभवाने आगमन झाले.

धार्मिक विधीला सुरुवातनंदीध्वजांच्या आगमनानंतर दुपारी २ वाजून वाजता मानकरी हिरेहब्बू व देशमुखांनी संबळाच्या निनादात गंगापूजनाला सुरुवात केली. त्यानंतर श्री सिध्देश्वरांच्या योगदंडाच्या साक्षीने विधिपूर्वक सुगडीपूजन केले. त्यानंतर कुंभार यांना विडा देण्यात आला. १ वाजून ५५ मिनिटांनी तम्मा शेटे यांनी मंगलाष्टक हिरेहब्बूंच्या स्वाधीन केले. मानकरी हिरेहब्बू व देशमुख यांनी संमतीची विधिवत पूजा करून शेटे यांना विड्याचा मान दिला. पूजेनंतर मंगलाष्टक मानकरी सुहास शेटे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले. सर्व मानकरी संमती कट्ट्यावर आल्यानंतर त्याठिकाणी पंच कमिटींच्यावतीने हिरेहब्बूंचा सत्कार करण्यात आला.

सुहास शेटे यांनी संमतीवाचनास सुरुवात केली. दिड्यम् दिड्यम्, सत्यम् सत्यम् असे मंगलाष्टक उच्चारताच बोला बोला एकदा भक्तलिंग हर्ऽऽ बोला हर्ऽऽ श्री सिध्देश्वर महाराज की जय हर्ऽऽ' असा जयजयकार करीत लाखो भाविकांचे हात नंदीध्वजावर अक्षता टाकण्यासाठी उंचावले. शेटे यांनी पाच मंगलाष्टके म्हटल्यानंतर प्रत्येक वेळी उपस्थित सिध्देश्वरभक्त अक्षता टाकत सिध्देश्वरांना मनापासून नमन करीत होते.



अक्षता सोहळा झल्यानंतर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सेल्फी काढली. यावेळी महापलिका आयुक्त शीतल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त विद्या पोळ,उपयुक्त मच्छिंद्र घोलप,सहायक आयुक्त विक्रमसिंह पाटील.



पालकमंत्री विखे-पाटील यांनी बारबंदीच्या वेषात सिध्दरामेश्वरांचे दर्शन घेतले. यावेळी सीईओ मनीषा आव्हाळे, आ.सुभाष देशमुख, आ.राजेंद्र राऊत, आ. आवताडे, आ.सचिन कल्याणशेट्टी, शहाजी पवार, अप्पु पाटील-वडकबाळकर, चन्नवीर चिट्टे आदी.



यंदाच्या वर्षी सिध्देश्वर यात्रेत कर्नाटकातून आलेल्या बाहुली नृत्याने मिरवणुकीत आणखीनच रंग भरला.

### रा. स्व. संघाच्या संस्कार भारतीची नयनरम्य रांगोळी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कार भारतीने हम सब का एकही नारा विश्वगुरू हो देश हमारा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, आत्मनिर्भर भारत खादी स्वदेशी आयुर्वेद, भारतीय संगीत, स्वच्छता कचरा विलगीकरण पर्यावरण आधी संदेश रांगोळीतून दिला. यावेळी गो पद्म केंद्रवर्धिनी सर परी बिंदू स्वस्तिक अशी एकोणीस मांगल्ये चिन्ह रेखाटले होते. संस्कार भारतीच्या रंगावली सेवेचे यंदाचे २४ वे वर्ष आहे. तब्बल दीड हजार किलो रंग आणि ५० पोती रांगोळी वापरून ही रंगवली रेखाटण्यात आली. रात्री १० ते सकाळी ९ संस्कार भारतीचे अखिल भारतीय प्रमुख रघुराज देशपांडे, मार्किंग प्रमुख बाळू वल्लाल, प्रतीक पाटील, चिन्मय अभ्यंकर, शहर प्रमुख ममता अवस्थी संगीता, भांबुरे, अनंत देशपांडे, गौरी महामुनी आणि संस्कार भारतीच्या कार्यकर्त्यांनी ही कला सादर केली.

### मानकऱ्यांना दिला विडा

अक्षता सोहळ्यानंतर उपस्थितांनी श्री सिध्देश्वर मंदिरात जाऊन व मुख्य मंदिरात श्री'चे मनोभावे दर्शन घेतले. अक्षतानंतर नंदीध्वज अमृतलिंगाजवळ आले. त्याठिकाणी अमृतलिंगास पंचामृत अभिषेक करून विधिवत पूजा झाली व मानकऱ्यांना विडा देण्यात आला. योगसमाधी व मुख्य मंदिरातही पूजा करून नंदीध्वज पुन्हा ६८ लिंगांच्या प्रदक्षिणेस मार्गस्थ झाले. शिवयोगी सिध्देश्वरांच्या यात्रेच्या पहिल्या दिवशी शुक्रवारी मानाच्या सातही नंदीध्वजांनी नगरप्रदक्षिणा करून ६८ लिंगांना भक्तिभावाने तैलाभिषेक केला होता.

### संमती कट्ट्यावर फुलांची आकर्षक सजावट

सकाळपासून मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांची गर्दी होती. मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला होता. अक्षता सोहळा साजरा होणाऱ्या संमती कट्ट्यावर रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांचे तोरण बांधले होते. या संमती कट्ट्यावरील शिवलिंगाचे दर्शन घेऊनच भाविक मंदिरात सिध्देश्वरांच्या दर्शनासाठी जात होते. या अक्षता सोहळ्याचे बसवराज शास्त्री, सुभाष स्वामी प्रा. बिराजदार यांनी रसाळवाणीने विवेचन केले.

### आज होमविधी, भाकणूक

श्री सिध्देश्वर यात्रेतील तिसऱ्या दिवशी रविवारी रात्री १० वाजता होम मैदानावरील होमकट्ट्यावर होमविधीचा सोहळा पार पडणार आहे. त्यासाठी सायंकाळी ५ वाजता नंदीध्वजांची मिरवणूक होमकट्ट्याकडे निघणार आहे. रात्री ११ वाजता भगिनी समाजजवळ वासराची भाकणूक होणार आहे.

### लोकप्रतिनिधींसह अधिकारीही बारांबदीत

या सोहळ्याला लोकप्रतिनिधींसह अधिकारीही बारांबदीत दिसून आले. पालकमंत्री विखे-पाटील, आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह उपजिल्हाधिकारी आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत वाघमारे यांनीही बाराबंदीचा गणवेश परिधान करून नंदीध्वज मिरवणुकीत सहभाग नोंदवला. यावेळी मनपा आयुक्त शीतल तेली उगले, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, श्री सिध्देश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, माजी आमदार दिलीप माने, महेश कोठे, शिवसेना संपर्क प्रमुख अनिल कोकीळ आदी उपस्थित होते.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कार भारतीतर्फे दरवर्षी परंपरेप्रमाणे यंदाही तीन किलोमीटर लांब रांगोळ्यांच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. या रांगोळ्यांच्या पायघड्याचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते दत्त चौकात करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य चन्नवीर बंकुर उपस्थित होते.



यात्रेनिमित्त पोलीस आयुक्तलयाच्या वतीने जवळपास दीड हजार पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचा असा बंदोबस्त लावण्यात आला होता.



तब्बल दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर यंदा खुल्या वातावरणात अक्षता सोहळा होणार असल्यामुळे सर्वच भाविक उत्साही होते. सकाळी नऊ वाजल्यापासूनच सिद्धरामेश्वर मंदिरात महिला भाविकांची लगबग सुरू झाली होती. अक्षता सोहळा जवळून पाहता यावा याकरिता जागा मिळवण्यासाठी भाविकांची धडपड सुरू होती.





अक्षता सोहळ्यात बारांबंदीमधील भक्त अक्षता टाकताना....